१.अचघर्षण	२.प्रजापति
३.परमेष्ठि	४.ब्राम्हणस्पणि किंवा बृहस्पती
५.अनिल	६.दीर्घतया
७.नारायण	८.हिरण्यगर्भ आणि विश्वकर्मा

बुध्दाच्या कालखंडामध्ये तत्त्ववेत्याचे ६२ पंथ होते.त्यापैकी सहा पंथ मुख्य होते.ते याप्रकारे...

१.क्रियावाद-कश्यप
२.नियतीवाद (विशचवाद)- मक्खली गोसाल
३.उच्छेदवाद-केशकवल
४.अन्मोनवाद-पकध कच्चायन
५.विक्षेपवाद-संजय बेलबुत्ता
६.चातुमात्मसांवरवाद-महावीर

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

दसशील

१. अहिंसेचे पालन करणार
२. नेहमी सत्य बोलणार
३. चोरी करणार नाही
४. वस्तूंचा संग्रह करणार नाही
५. भोगविलासापासून दूर राहणार
६. नृत्य-संगीताचा त्याग करणार
७. सुगंधी वस्तूंचा उपभोग करणार नाही
८. अवेळी भोजन करणार नाही
९. बिछान्यावर झोपणार नाही
१०. स्त्री मोहापासून दूर राहणार

बुध्द होण्याकरिता बोधिसत्त्वाला दहा स्थित्यंतरे पार करावी लागली :

१. मुदिता (आनंद)
२. विमलता (शुध्दता)
३. प्रभावकारी (तेजस्विता)
४. अचिंतनकारी (अग्रीप्रमाणे तेजस्वी बुध्दिमत्ता)
५. गंगा जिंकण्यास कठीण अशी स्थिती
६. अभिमुखी
७. दूरङ्म्मा (दूर जाणे)
८. अचल
९. साधुमती
१०. धम्मानिध

पाच भिक्खु

१.कौडिन्य २.भद्दीय ३.वप्प
४.महानाम ५.अश्वजीत

तथागत सुगत बुध्दानी पाच भिक्खुंना सारनाथ येथे प्रथम उपदेश केला त्यामध्ये चार आर्यसत्य सांगितली...

१. जगात दुःख आहे
२. त्या दुःखाला कारण आहे
३. हे कारण म्हणजे तृष्णा (वासना) होय.
४. वासना नियंत्रित करणे हा दुःख निवारण्याचा उपाय/मार्ग आहे.
१. दुःख
२. दुःखाचे मूळ
३. दुःख निरोध
४. दुःख निरोधाचा मार्ग

दस पारमिता

१.शील	२.दान
३.उपेक्षा	४.नैष्क्रम
५.वीर्य	६.शांती
७.सत्य	८.अधिष्ठान
९.करुणा	१०.मैत्री

तथागत सुगत बुध्दाचे तत्त्वज्ञान

१.प्रतित्यसमुत्पाद-कार्यकारणभाव
कोणत्याही घटनेला कारण असते.
इमस्स सति इदं होति
इमस्स भ्रसति इदं होतिफ- दीघनिकाय
२.तिलक्खन -दुःख,अनित्य,अनात्मक्ता
३.निब्बान -निर्वाण
४.बोधिसत्त्व सिध्दांत-बोधि-ज्ञान,सत्त्व-प्राणी-ज्ञानसाठी,ज्ञानप्राप्तीकरिता प्रयत्नशील प्राणी
१.बोधिसत्त्व-ज्ञानप्राप्तीकरिता प्रयत्नशील
२.प्रत्येक बुध्द-पश्चेक् बुध्द, ज्ञानप्राप्त झाले तरी ज्ञान देत नाही.
३.सम्यक सम्बुध्द- मला ज्ञान मिळाले मी त्या ज्ञानाचा उपयोग जगातल्या मानव कल्याणासाठी करणार.जगातील लोक जेव्हापर्यंत दुःखातून मुक्त होणार नाहीत.तेव्हापर्यंत निर्वाणपद स्विकारणार नाही.ज्ञानभक्ती देणे,दुःखातून मुक्त करणे,शंकेचे निरसन,वादविवादपटू तयार करणे,उपासकांमध्ये पूर्णत:ज्ञान देणे,इत्यादी कार्य करणे.तसेच दुःख दूर करणे तेव्हाच मी महापरिनिर्वाण करणार.महापरिनिर्वाण-निब्बाणसुत्त यामधील उपदेश हा निर्वाणप्राप्तीचा आहे.

अजिंठा

अजिंठ्याचा विचार करताना...
१.लेणी-व्याख्या
२.अजिंठा लेणीचा शोध-जॉन स्मिथ
३.अजिंठा लेणीचा निर्मितीकार
४.वाङ्मय-व्याख्या
५.अजिंठा-वाङ्मय

१.लेणी-व्याख्या

१. लेणी-लेण ख लेण अव.ण्णी.सा.ण्णी.१ (नं अ+जि) वि.न जिंकता येणारा[१]
२. लेण (स्त्री) रेघ,ओळ,रेषा,लाईन (इ)[२]
३. लेणे न. डोंगरात पोखरून बांधलेले ठिकाण, बौध्द, जैन, वगैरेचे डोंगरातील प्रार्थना मंदिर - Cave[३]

ISSN No. 2394-5990

२.अजिंठा लेणीचा शोध–जॉन स्मिथ

अजिंठा लेणी एका घनदाट जंगलात आहे.सह्याद्री पर्वत रांगेत व वाघुरा नदीच्या किनारी नालाकार आकारामध्ये ही लेणी स्थित आहे.अजिंठा लेणी बौध्द तत्त्वज्ञानाचे एक प्रमुख केंद्रस्थान होते.इसवी सन ७६८ साली अचित संघारामाची,जो आज अजिंठा म्हणून प्रसिध्द आहे.ओळख चीनमध्ये सिंहली भिक्षू अमोघवज्रद्वारे केल्या गेली होती.चीनमध्ये बौध्द धम्माच्या योगाचार पंथाचा जो प्रसार झाला.त्यात अजिंठा संघारामातील भिक्खूंनी फार मोठी भूमिका पार पाडली.[४]

महामयूरीफ या बौध्द ग्रंथात अजिंतजय नावाच्या एका स्थळाचा उल्लेख येतो.जे यक्ष कूटदंष्ट्र यांचे निवासस्थान होते.नंदलाल दुबे हे प्राचीन भारतीय भूगोलाचे एक प्रसिध्द अभ्यासक असून त्यांनी अजिंठ्याचे प्राचीन नाव ङ्कअचिंत्य संघारामफ असण्याची शक्यता वर्तवली" भिक्खु हे अध्यापनाचे कार्य करीत असत.कालांतराने बौध्द धम्माचा ऱ्हास झाल्यानंतर या लेणीकडे दुर्लक्षित म्हणून पाहिले गेले. ही लेणी जेव्हा दुर्लक्षित होती. अशावेळी जंगलातील हिंस्त्र पशू इथे वास्तव्यास राहत होते.प्रदीर्घ व विस्तारित असणारी ही लेणी याकडे कुणाचे लक्ष जाऊ नये? ही बाब अतिशय गंभीर आहे. मद्रास सेनेतील एक इंग्रज अधिकारी अजिंठ्यावरून जात असताना इसवी सन १८१९ मध्ये ते आपल्या पलटणीच्या तुकडीसोबत चालले असताना त्यांना शिकार करण्याची इच्छा झाली.वाघाची शिकार करण्याच्या हा एक प्रदेश होता. त्यामुळे त्यांनी फर्दापूरच्या एका गुराखी मुलाला वाघाचे घर दाखविण्यास घेऊन गेले.तिथे गेल्यानंतर उंच टेकडीवर उभे राहून त्यांनी दूरवर आजूबाजूचा परिसर बघितला.ते बघताना त्यांच्या दृष्टीपथास प्रथमत: काय पडले तर अजिंठा लेणी.ही त्यांच्या दृष्टीपथास पडली.नालाकार पहाडाच्या कुशीत दडलेलं.ते आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर हे बघून अचंबित झालेत.ज्या ठिकाणाहून त्यांनी ही लेणी बघितली.ते ठिकाण उंच होते.त्यांना लेणी क्रमांक दहा ही प्रथमत: दृष्टीपथास पडली.त्या इंग्रज अधिकार्याचे नाव जॉन स्मिथ असे होते.लेणी क्रमांक दहाच्या सभामंडपातील तेराव्या स्तंभावर अग्रभागी इंग्रजीत एक लेख आढळून आला.

John Smith 28th Cavalry 28 -pril 1819[६]

स्थानीय दंतकथेच्या आधारित ज्या इंग्रजी सैनिक अधिकार्याने या लेणीचा शोध लावला.तो अठ्ठाविसाव्या घोडेस्वार सेनेचा जॉन स्मिथ होता.आणि ही रोमांचकारी घटना २८ एप्रिल १८१९ ला घडली.ही लेणी शेकडो वर्षापासून अज्ञात होती.यानंतर कलात्मकतेने या लेण्याकडे संशोधकांची दृष्टी वळली आणि आज इथे दिवसभर हजारो पर्यटकांची फार मोठी वर्दळ सुरू असते.या लेण्यांची चर्चा सर्वप्रथम मद्रास एस्टॅब्लिशमेंटचा कॅप्टन मोरागनच्या सूचनेवरून ङ्कविलियम एस्किनफ्याने 'बॉम्बे लिटररी सोसायटी'समोर १९२२ मध्ये वाचलेल्या निबंधात केली होती.[७]

३.अजिंठा लेणीचा निर्मितीकार :

अजिंठा लेणीचा निर्मितीकार कोण? हा एक महत्त्वपूर्ण प्रश्न,या बाबीचा विचार करताना,सम्राट अशोक यांच्या काळात या लेणीचा प्रारंभ झाला.इसवी सन पूर्व २३२ मध्ये सम्राट अशोक यांचे निधन झाले.ही लेणी इसवी सन पूर्व २०० असे शतक इतिहासकार मानतात.दगडातून गुहा,शिलालेख, विहार, स्तूप, संघाराम, लेणी,इत्यादींची निर्मिती केली.जंबूव्दीपातील शिल्पकार–चित्रकारांनी हे कार्य केले.विशेषत:याकरिता बौध्द भिक्खु यांचे मोलाचे योगदान आहे.सम्राट अशोकानंतर सातवाहन व इतर राज्यांनी हे कार्य सांभाळले.लेणापूर येथील कामगार वर्ग यांनी रांत्र–दिवस राबुन हे कार्य पूर्ण केले.किंबहुना असेही म्हणावेसे वाटते की,लेणी तयार करणाऱ्या निर्मितीकाराचे गांव म्हणजे लेणापूर आहे.छन्नी–हातोडा यातून एक भव्य शिल्पाकृती निर्माण झाली.

४.वाङ्मय–व्याख्या :

वाङ्मय–वाङ्–वाच्य–वाक–बोल–जे वाणीबध्द व बोलल्या गेलं आहे ते वाङ्मय.

साहित्य–जे वाणीबध्द व बोलल्या गेलं आहे. त्या वाङ्मयाला लेखन स्वरूपात आणण्यास ज्या साधन सामग्रीचा उपयोग केल्या जातो.त्या साधन सामग्रीला साहित्य असे म्हणतात.

उदा. शिळा, दगडीशस्त्रे, दगडीकोळसा, चुनखडी, गेरू, कोळसा, ताम्रपट, मूर्ती, स्तंभ, लाकूड, मृद्भांड, शाई, टाक, लेखणी, पेन, तालपत्र, चर्म, कागद इत्यादी साधन सामग्री दिसते.

वाङ्मय आणि साहित्य हे पूर्वी वेगवेगळे होते. ब्रिटीश काळात छापखाने आल्यानंतर हे दोन्ही शब्द समानार्थी झालेत.

ललित कला पाच ललित कला आहेत–गीत, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प या पाच कलांचा केंद्रबिंदू वाङ्मय–साहित्य आहे.

५. अजिंठा–वाङ्मय

अजिंठा लेणी नदीच्या पात्रापासून ४० ते१०० फूट उंचीवर ह्या लेणी कोरण्यात आली आहे.खालून वर अशा पध्दतीने ह्या लेणीची शिल्पांकन आहे.अप्रतिम,अद्भूत,अविस्मरणीय असे वर्णन साहजिकच संशोधक,रसिक, आस्वादक करताना दिसतात.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Socio Sciences
NAGPUR

अजिंठा आणि वाङ्मय या विषयाच्या अनुषंगाने विचार करताना, अजिंठा लेणीतील वाङ्मयाचे तीन प्रकार दिसतात.

१.तथागताचे जीवनदर्शन

२.जातक कथा

३.अभिलेख

१.तथागताचे जीवनदर्शन : तथागताच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाणापर्यंत चित्रकाव्य-शिल्पकाव्य रेखाटले आहे.

अजिंठ्याच्या लेणी क्रमांक-१मध्ये जगप्रसिध्द बोधिसत्त्व पद्मपाणी अतिशय सुंदर रेखाटले आहे.तसेच राजपुत्र सिध्दार्थ यांचे चित्रण केले आहे. अजिंठ्याच्या लेणी क्रमांक-२मध्ये तथागत सुगत बुध्द यांच्या जन्माप्रसंगीचे चित्रण केले आहे. हे चित्र सभागृहाच्या डावीकडील भिंतीवर आहे आणि बरेचसे खराब झाले आहे.[१] याच लेणीत डाव्या बाजुला महामायाचे सिध्दार्थाच्या जन्मापूर्वीचे शिल्पांकान करण्यात आले आहे.त्रिपिटकातील-निदान कथा यामध्ये हे वर्णन आढळते.महामायेला पडलेले स्वप्न या चित्रात अंकित आहे. महाभिनिष्क्रमणाचा प्रसंग हा तत्कालीन शेतकऱ्यांचे व वर्तमान समस्या दर्शविते. रोहिणी नदीचा वाद निर्माण झाल्याने सिध्दार्थाला कपिलवस्तू सोडावे लागले.या नदीचे पाणी शाक्य व कोलिय या दोन्ही वंशीय जनतेला उपयोगी ठरावे.शेतीकरिता दोन्ही प्रदेशांना गरज होती. ङ्करोहिणी नदीच्या पाण्याचा वाटा हा समान हवाफअसे सिध्दार्थानी सांगितले.वरिष्ठ मंडळी हे मानायला तयार नव्हते.युध्द करणे सिध्दार्थाला अमान्य होते.लेणी क्रमांक १७ मध्ये गृहत्याग- महाभिनिष्क्रमणाचा प्रसंग चित्रांकन केला आहे.लेणी क्रमांक २६ मध्ये तथागताची सर्वात लहान मूर्ती व सर्वात मोठी महापरिनिर्वाणाची शिल्पाकृती आहे.

२.जातक कथा :

इसवी सन पूर्व ६ व्या शतकात तथागताच्या काळात त्यांच्या जीवनावर अनेक कथा निर्माण झाल्यात.जातक कथा या ग्रंथात एकंदर ५४७ कथा आहेत.मानवी जीवनातील नैतिकता त्यातून प्रत्ययास येते.जातक म्हणजे जन्म.तथागत सुगत बुध्दाच्या पूर्वजन्माच्या कथा आहेत.पूर्वजन्म हे कल्पित असून तथागताच्या कार्य कर्तृत्वावर प्रकाशझोत टाकतात.३६ जातक कथांची चित्रे व शिल्पे चित्रित आहेत.या लेणीत काही कथा तर काही जातक कथा आहेत.सौदरानंद नाटकाचे दृश,शिबी जातक,शंखपाल जातक,महाजनक जातक,चंपेय्य जातक,हंस जातक,विदुर पंडित जातक,रुरु जातक,शाम जातक,षड्दंत जातक,हस्ती जातक,महाउम्मग जातक,वेस्संतर जातक,महाकपि जातक,सुतसोम जातक,शरभ मृग जातक,मत्स जातक,मातुपोषक जातक इत्यादी काही जातक कथा आढळतात.

३. अभिलेख :

अजिंठ्याच्या लेणीत अभिलेखावरून तत्कालीन काळातील घडामोडी लक्षात येतात.लेणी-२, ४, ६, ७, ९, १०, ११, १२, १६, १७, २०, २१, २२, २६,२७ इत्यादी लेणीत हे अभिलेख आढळतात. यातून राजकीय, सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक घडामोडीचे दर्शन घडते.

अशाप्रकारे बौध्द तत्त्वज्ञान जागतिक अजिंठ्याच्या भूमीतून नव्या वाङ्मयाची निर्मिती झालेली दिसते.

निष्कर्ष

१. तथागत सुगत बुध्द हे विज्ञानवादी होते.
२. बौध्द तत्त्वज्ञान हे विचारांवर आधारित आहे.
३. बौध्द तत्त्वज्ञानातील निसर्गमूल्ये-नैतिक मूल्ये ठरतात.
४. बौध्द तत्त्वज्ञान मानवी जीवनाकरिता कल्याणकारी आहे.
५. अप्रतिम शिल्प-चित्र याकरिता अजिंठा लेणीला जागतिक दर्जा देण्यात आला आहे.
६. चित्रांकन अतिशय बोलके आहे.
७. अजिंठा लेणी ही अप्रतिम व अद्भूत आहे.
८. अजिंठा लेणीचे मूलस्त्रोत वाङ्मय आहे.
९. भिंती,स्तंभ,मूर्ती यावर अभिलेख उत्कीर्ण करण्यात आले आहे.

संदर्भ सूची :

१. द.ह.अग्निहोत्री (संपादक)-अभिनव मराठी-मराठी शब्दकोश,पहिला भाग व्हीनस प्रकाशन,पुणे १९८३, पृ.क्र.३४८.
२. प्र.न.जोशी-आदर्श मराठी शब्दकोश,विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,पुणे,तृतीयावृत्ती,१९९२,पृ.क्र.१०८८.
३. कृ.पां.कुलकर्णी-मराठी उत्पत्तीकोश,तिसरी आवृती,शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे,१९९३,पृ.क्र.६८०
४. दास शरदचंद्र-इंडियन पंडीत इन लॅड ऑफ स्नो,कलकत्ता १९६५, पृ. ४३ ५.दि जिऑग्राफिकल डिक्शनरी ऑफ एनशियंट ॲण्ड मिडिवल इंडिया,दिल्ली १९११, पृ.१.
६. ढवळीकर एम.के.-न्यू इंस्क्रिप्शंन फ्रॉम अजंता आर्स ओरिएंटालिस, खंड ७,पृ.१५२.
७. ट्रांजेक्शंस ऑफ दि बॉम्बे लिटररी सोसायटी,खंड ३ पृ.५२०,केव्ह टेंम्पल्स ऑफ इंडिया,पृ.२८०-८१.
८. मित्र देवला-अजंता,दिल्ली २००३,पृ.३०.

■■■

ISSN No 2394-5990

४५. अनुसूचित जातीतील शेतकरी-यांच्या समस्या व घरण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा
- श्री. अशिष अशोक इरमल, डॉ. राजेंद्र य.शिंदे ---------- २०८

४६. २१ व्या शतकातील भारतीय शिक्षणप्रणालीतील नये प्रवाह आणि आव्हाने
- प्रियांका मधुकर गुंजाळ, डॉ. किशोर गिरीश नवले ---------- २१४

४७. २१ व्या शतकाच्या विशेष संदर्भात भारतीय रिपब्लिकन पक्षाचे चंद्रपूर जिल्ह्यातील सामाजिक कार्याचा आढावा
- शुभम जयदास सांगोडे, डॉ. दिवाकर एन. कामडी ---------- २२०

४८. मानसिक आरोग्य: एकविसाव्या शतकातील एक सामाजिक समस्या
- प्रा.डॉ.आर.एस.पवार ---------- २२४

४९. सौर ऊर्जा : नैसर्गिक संसाधनावरील एक शाश्वत पर्याय
- सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे, प्रा. डॉ. किशोर वि. साबळे ---------- २२८

५०. २१ व्या शतकातील महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप आणि अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक कार्याचा प्रभाव
- उज्ज्वला वाल्मीक नगराळे, डॉ. प्रमोद नानाजी घ्यार ---------- २३४

५१. मंगळवेढ्याचा पर्यटनविषयक दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास
- प्रा. डॉ. राजेराज नामदेव कांबळे ---------- २३७

५२. समृद्ध ग्रामीण विकासाचा नवा मार्ग "कृषी पर्यटन"
- प्रा.प्रियांका विनायक पाटील ---------- २४१

५३. एकविसाव्या शतकातील जातीनिर्मूलन आणि आजचे राजकारण
- जोत्सना लिलाधरजी गजभिये, डॉ. विशाखा संजय कांबळे ---------- २४४

५४. एकविसाव्या शतकातील समाजापुढील आव्हाने
- कोमल प्रकाशराव बरके, डॉ.विशाखा संजय कांबळे ---------- २४८

५५. २१ व्या शतकातील महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप
- डॉ.नरेंद्र इश्वर घरत, डॉ.रायन महाजन ---------- २५३

५६. २१ व्या शतकातील परराष्ट्रिय धोरण
- प्रा. मनेश पुरूषोतम पारखी, प्रा. डॉ. रेखा मनोहर बढोदेकर ---------- २५७

५७. २१व्या शतकात भारतातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य
- प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड ---------- २६१

५८. २१ व्या शतकातील मराठी महानगरीय कथा ---------- २६६

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt.
of Arts and Social Sciences
NAGPUR

एकविसाव्या शतकातील जातीनिर्मूलन आणि आजचे राजकारण

जोत्सना लिलाधरजी गजभिये
अंशकालीन प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था नागपुर
ई.मेल-jatsnagajbhiye77@gmail.com,
मोबाईल नं. 7709696104

डॉ. विशाखा संजय कांबळे
मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख- मराठी विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था नागपुर
ई.मेल-vishakha042@gmail.com,
मोबाईल नं 9850150861

सारांश :

आज एकविसाव्या शतकात देखील भारतात जात ही संकल्पना आपले मूळ घट्ट रोवून बसली आहे. भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक दुर्बलतेच कारण केवळ जातीव्यवस्था आहे. जोपर्यंत भारतीय समाजातून जातिव्यवस्था हद्दपार होत नाही, तोपर्यंत भारत प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यास असमर्थ राहील. प्रत्येक भारतीय व्यक्तीला स्वतःच्या जातीबद्दल असलेला अभिमान त्याला दुसऱ्या जातीच्या व्यक्तीला आपले मानू देणार नाही. आणि राजकीय पक्ष देखील जातीव्यवस्थेचा फायदा घेत राहील.

बीज शब्द : जातीनिर्मूलन, समाजव्यवस्था, राज्यघटना, लोकशाही, राजकीय पक्ष

प्रस्तावना :

जातीव्यवस्था ही भारतीय समाजव्यवस्थेला लागलेली कीड आहे. जातीव्यवस्थेने भारतीय समाजाला चार वर्गातच नाही तर चार-पाच हजार प्रकारात विभागले आहे. कारण प्रत्येक जातीच्या पोटजातीही भारतीय समाजव्यवस्थेत आहे. भारतीय समाजाने जातीयव्यवस्थेला कितीही नाकारण्याचा प्रयत्न केला तरी हे सत्य बदलत नाही की, प्रत्येक भारतीय व्यक्तीचा जन्म कुठल्या ना कुठल्या जातीतच होतो. व त्यांची जात त्याचे नाव ठरण्याच्या आधीच ठरलेली असते.

''भारतीय समाजाची रचना जातीव्यवस्थेनुसार झाली आहे. जातीचे वैशिष्ट्य म्हणजे श्रेष्ठ-कनिष्ठता उच-निचता मानणे. त्यामुळे एक जात दुसऱ्या जातीपेक्षा एक तर पुण्यवान तरी असते नाही तर पापी तरी असते. त्यामुळे जातीव्यवस्थेतील समाज हा एकरूप, एकजीनशी कधीच नसतो. एका जातीतल्या समूहाला दुसरा जातीसमूह परका वाटत असतो. त्यामुळे कुठल्याही दोन जातींमध्ये एकमेकांबद्दल द्वेष असतो. म्हणूनच त्या दोन वा अधिक जातीमध्ये बंधुभाव, समता आणि स्वातंत्र्य या गोष्टीचा अभाव असतो'' ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक ठरते अशा परिस्थितीत जातीविरहित राजकारण करण्याचा राजकीय पक्ष विचार देखील करत नाही. राजकीय पक्ष जातीच्या आधारावर लोकांचे भावनिक शोषण करीत असतात.

उद्देश :

१) भारतीय राजकारणातून जातीव्यवस्थेचे महत्त्व कमी व्हावे.
२) निवडणुकीला राजकीय पक्षाकडून उमेदवार उभे करताना त्याच्या जातीचा विचार न करता त्याचा योग्यतेचा विचार व्हावा.
३) राजकीय पक्षाची भूमिका जातीविरहित असावी.
४) मतदारांनी मतदान करताना उमेदवाराच्या जातीचा विचार न करता त्याचा योग्यतेचा विचार करावा.
५) एकविसाव्या शतकातील भारतीय राजकारण धर्मनिरपेक्ष असावे.
६) भारतीय राजकारणात व्यक्तिपूजेला महत्त्व देता नसावे.
७) सर्व भारतीय नागरिकांना विकासाची समान संधी मिळावी.

जातिव्यवस्थेचे मूळ :

भारतीय समाजव्यवस्थेत जातिव्यवस्थेचे मूळ हे मनुस्मृतीसारख्या ग्रंथात आढळते. समाजव्यवस्थेत कर्माच्या आधारे असलेली विभागणी जातीत बदलली. आणि जातीव्यवस्था अस्तित्वात आली. परंतु ही जातीव्यवस्था टिकवून ठेवण्याचे कार्य मात्र भारतीय लोकांच्या मानसिकतेने केले. आपल्या जातीबद्दल असलेला प्रचंड अभिमान आणि त्यातही उपजातीचा असलेला अभिमान याने भारतीय समाजव्यवस्था पूर्णपणे खिळखिळी करण्याचे काम केले. धडधाकट दिसणाऱ्या शरीरात रोगाचे वास्तव्य असावे तसे आपल्या देशात वर्णव्यवस्थेचे आणि तिने पोसलेल्या जातीप्रतीचे अस्तित्व, चीरस्थायी झाले आहे. ह्या व्यवस्थेचा फटका आणि फणकारा ज्याने अनुभवला,

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ISSN No. 2394-5990

त्या डॉ. आंबेडकरांनी त्याआधी म. फुले यांनी त्याआधी लोकहितवादी आदी अनेक विचारवंतांनी आपले आयुष्य खर्चून, संघर्ष उभारला होता.[३] तरीदेखील भारतातील जातीव्यवस्था मात्र नष्ट होऊ शकलेली नाही. अर्वाचीन जातीप्रतीमुळे हिंदुस्थानचे पाऊल पुढे पडत नाही. या धोरणामुळे समाजाचे लहान -लहान तुकडे पडून ते आपल्या कक्षेत कुजू लागले आहेत स्वामी विवेकानंद च्या उपरोक्त वचनाची प्रचिती आज अत्यंत तीव्रपणे येत आहे.[३]

राज्यघटनेतील समानता :

भारतीय राज्यघटनेत समानता हे महत्त्वाचे तत्त्व आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ ,१५, १६ , १७ मध्ये समानता, ानसंधी आणि अस्पृश्यता निर्मूलन हे समानतेच्या हक्कात समाविष्ट केलेले आहे. ङ्गएक मनुष्य एक मतफ तसेच सर्वांच्या मताचे सारखेच मूल्य हे तत्व राज्यघटनेत स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेत माणूस हा केंद्रस्थानी असल्याचे आपणास दिसून येते. भारतीय राज्यघटनेत लिंग,धर्म,जात या सर्व बाबतीत समानतेचा स्वीकार करण्यात आलेला आहे. आज मात्र भारतीय राजकारणत व्यक्तिपूजेला फार महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब, लोकशाही हे प्राणप्रिय मानवी मूल्य मानत होते. व्यक्तींचे कार्य व महात्म्य यांचा आदर जरूर व्हावा असे त्यांना वाटे ,पण तरी अशा कोण्याही व्यक्तीच्या पायावर आपले व्यक्तीस्वातंत्र्य वाहायला ,त्यांनी भक्कमपणे नकार दिला आहे.[४]

जातिव्यवस्था लोकशाहीसाठी घातकच :

जातीव्यवस्था लोकशाहीसाठी घातकच असते २१ व्या शतकात देखील ही जातीव्यवस्था आपले मुळे घट्ट रोवून असल्यामुळे लोकशाहीसाठी ते घातकच ठरत आहे. आपल्या राजकीय लोकशाहीचा पाया सामाजिक लोकशाहीवर आधारलेला हवा. असे नसेल तर राजकीय लोकशाही जास्त काळ टिकाव धरू शकत नाही.[५] आणि आपली सामाजिक लोकशाहीच समानतेच्या पायावर उभी नाही. त्यामुळे राजकीय लोकशाही प्रस्थापित झाली नाही.

एकविसाव्या शतकात देखील निवडणुकीला उमेदवार उभे करताना, कोणत्या भागात कोणत्या जातीचे लोक जास्त राहतात याचा विचार राजकीय पक्षाकडून केला जातो. ही परिस्थिती लोकशाहीला मारकच ठरते. तसेच निवडून आलेले लोक सुद्धा आपल्या जातीतील मागासलेल्या लोकांचा विचार न करता आपल्या पक्षापुरताच विचार करत असतात. ही बाब राजकारणात समोर येताना दिसते. आज भारतात लोकशाही आहे ,पाश्चात्यांचे अनुकरण देखील होऊ लागले आहे, नवनवीन शोध लागत आहे, भारत चंद्रावर देखील पोहोचला आहे. परंतु या नवीन बदलाने देखील भारतातील जात ही संकल्पना नष्ट केलेली नाही.

एकविसाव्या शतकातील भारतातील राजकारण :

२१ व्या शतकतील भारतीय राजकारणाकडे आपण पाहिले तर आपल्याला जाणवते की, भारतीय राजकारणात विशिष्ट जातीच्या व्यक्तीला आणि त्यातही व्यक्ती पूजेला जास्त महत्त्व प्राप्त झालेले आहे. ''डॉ. आंबेडकरांना व्यक्तीपूजेपेक्षा विचारांची पूजा महत्त्वाची वाटते. घटनापरिषदेत समारोपेचे भाषण करताना ते म्हणाले 'भारतीय राजकारणात व्यक्तीपूजा अगर भक्तीचा प्रभाव एवढा आहे की, इतर कोणत्याही देशातल्या राजकारणात अशी भक्ती व अशी व्यक्तीपूजा कोठेही आढळत नाही. धर्मात भक्तीमार्ग हा मुक्तीमार्ग बनू शकतो; परंतु राज़कारणात भक्तीमार्ग हा अध:पाताचा व पर्यायाने हुकूमशाहीचा खात्रीलायक मार्ग होतो.''[६] याचा अर्थ व्यक्तिपूजा लोकशाहीला मारकच ठरत असते. ती एकाधिकारशाहीला जन्म देत असते. त्यामुळे भारतीय राजकारणात जर लोकशाहीला पोषक असे वातावरण तयार करायचे असेल तर व्यक्तीपूजेला विरोधच व्हायला हवा.

''दुसऱ्या कोणीही तुमच्या द्वेषाला कारणीभूत होईपर्यंत, त्या माणसाचा अधिक्षेप करू नकाफ देश फक्त माझा! माझे वागणे-बोलणे म्हणजेच राष्ट्रीय,बाकीचे इथेले दुय्यम नागरिक, अराष्ट्रीय, असे सांगणारे, धूर्त नेतृत्व आणि त्यांचे म्हणणे, विचारही करण्याचा त्रास न घेता, स्वीकारणारे अनुयायी; हेच देशातले, मोठे जीवावरले दुखणे आहे. अशा वरवरल्या बेगडात अडकणारे आणि वाट्टेल त्या मार्गाने, समृद्धीच्या चोरवाटा काबीज करणाऱ्या, शिक्षित पण असंस्कृत-असहिष्णू तरुणांची वाढ होत जाणे; ही आजची शोकांतिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या, राजकारणाची आणि भाषणलेखनाची म्हणूनच, शांतपणाने दखल घेण्याची, कधी नव्हे ती गरज, आता निर्माण झाली आहे''[७] २१ व्या शतकातील भारतीय राजकारणात या समस्या दिसु लागल्या आहेत .त्यामुळेच आजचे भारतीय राजकारण कुठल्या दिशेला जात आहे याची आपल्याला कल्पना येते.

एकविसाव्या शतकातील भारतातील राजकीय पक्षाची भूमिका :

२१व्या शतकात जातीव्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे जातीव्यवस्थेमुळे, भारतातील राजकारण व राजकीय पक्ष देखील जातीच्या आधारे चालतात. भारतासारख्या लोकशाही असलेल्या देशात महापुरुषांची विभागणी देखील जातवार केली जाते, तेथे जातीप्रमाणे राजकीय पक्षाच्या भूमिका ठरणे स्वाभाविकच आहे. राखीव मतदारसंघ असल्यामुळे आपल्या विचारांचे विशिष्ट जातीचे

DIRECTOR
Yeshwantrao Naik Govt. Inst. of Arts and Social Science
NAGPUR

लोक निवडणुकीला उभे केले जातात. ते निवडून आल्यानंतर त्या उमेदवाराची निष्ठा आपल्या राजकीय पक्षावर असते तसेच मंत्रीपदे देताना सुद्धा जातीचा विचार केला जातो. त्यामुळे आजचे राजकीय पक्ष जातीव्यवस्था टिकवण्याचेच काम करत आहे असे म्हणावे लागेल.

देशात प्रत्येकाला जर आपल्या धर्माप्रमाणे जीवन जगता आले, इतर धर्मियांकडून त्यांच्यावर जर अन्याय झाला नाही तर तो देशाच्या प्रति एकनिष्ठ राहील आणि सहजतेने राष्ट्रीय एक्य प्रस्थापित होईल. अशा प्रकारचे जर विधायक प्रयत्न केला जातील तरच देशातील आजचे वैमनस्याचे स्वरूप बदलून राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित करण्याचे स्वप्न साकार होऊ शकेल८ त्या दृष्टीने जर राजकीय पक्षांनी प्रयत्न केले तर भारतीय राजकारणात आपल्याला सकारात्मक चित्र दिसेल.

२१व्या शतकतील भारतीय राजकरणातील जातीनिर्मूलनाच्या समस्या :

एकविसाव्या शतकात भारतीय राजकारणामध्ये जातीनिर्मूलन अद्याप होऊ शकले नाही .भारतीय राजकारणात त्यासाठी काही समस्या कारणीभूत आहेत .त्या पुढीलप्रमाणे.

१) कोणताही राजकीय पक्ष निवडणुकीसाठी उमेदवार उभे करताना तो कोणत्या जातीचा आहे याचा विचार केला जातो.

२) भारतातील बहुसंख्य मतदार सुद्धा मतदान करताना कोणता उमेदवार आपल्या जातीचा आहे .हे बघून मतदान करतात.

३) कोणत्या मतदारसंघांमध्ये कोणत्या जातीचे लोक जास्त राहतात याचा अभ्यास राजकीय पक्ष करतात व त्यानुसार उमेदवार उभे करतात.

४) भारतात निवडून आलेल्या उमेदवाराला मंत्रीपद देताना सुद्धा त्याच्या जातीचा विचार केला जातो.

५) भारतात राजकीय पक्ष एखाद्या जातीच्या आधारावर स्थापन होत असतात व त्या जातीप्रमाणे त्याची विचारधारा सुद्धा असते.

६) एकविसाव्या शतकात देखील भारतीय राजकारणात महापुरुषाची विभागणी त्यांच्या जातीप्रमाणे केली जाते. व त्याप्रमाणे राजकीय पक्षाची भूमिका ठरत असते.

भारतीय राजकारणातील जातीनिर्मूलनाचे उपाय :

आज आपण २१ व्या शतकात पोहोचलेलो असताना आजही जातीव्यवस्था राजकारणात असल्याचे आपल्याला जाणवते सामाजिक स्तरावर त्यामानाने जातीनिर्मूलनाचे अनेक उपाय अमलात आणले गेले. त्यावरून थोडेसे सकारात्मक चित्र आपल्याला दिसते. भारतीय राजकारणात देखील जाती-निर्मूलनावर उपाय शोधणे आवश्यक आहे ते पुढीलप्रमाणे.

१) राजकारणात धर्मनिरपेक्षतेचे पालन काटेकोरपणे व्हायला पाहिजे

२) राजकीय पक्षाने निवडणुकीला उमेदवार उभे करताना त्याची जात न बघता त्याची योग्यता, शिक्षण या गोष्टी बघायला पाहिजे.

३) कोणत्याही मतदारसंघांमध्ये निवडणुकीसाठी उमेदवार निवडताना त्या मतदारसंघात कोणत्या जातीचे लोक जास्त राहतात याचा विचार न करता राजकीय पक्षाने त्या मतदारसंघातील कोणता व्यक्ती जास्त योग्य आहे. जो मतदारसंघाचा विकास करू शकेल असा उमेदवार निवडावा.

४) मतदारांनी सुद्धा मतदान करत असताना कोणता उमेदवार आपल्या जातीचा आहे या आधारावर मतदान न करता कोणता उमेदवार आपल्या मतदारसंघाचा विकास करू शकेल अशा योग्य, शिक्षित व्यक्तीला मतदान करावे.

५) पक्षाने मंत्रीपद देताना त्या मंत्र्याची जात न बघता त्याची योग्यता बघून मंत्रिपद द्यावे.

६) पक्ष स्थापन करताना तो जातीवर आधारित न करता योग्य विचारधारेवर आधारित पक्ष स्थापन करावा.

७) जातवार महापुरुषांची विभागणी न करता सर्व महापुरुषांच्या विचाराचा आदर राजकीय पक्षांनी करावा.

८) भारतीय राजकारणात व्यक्तीपूजेला जास्त महत्त्व नसावे.

निष्कर्ष :

वरील सर्व चर्चा वरून आपल्याला काही निष्कर्ष काढता येतात ते पुढील प्रमाणे

१) जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी आजपर्यंत करण्यात आलेले सर्व उपाय कमकुवत ठरले आहेत.

२) भारतात जोपर्यंत जातीव्यवस्था राहील तोपर्यंत सर्व नागरिक समान पातळीवर येऊ शकणार नाही.

३) जातीप्रथेतील उच-नीच भावनेमुळे भारताला गरिबीपासून कधीही मुक्तता मिळणार नाही.

४) आजचे राजकीय नेते जातीवादी संघटना तयार करून त्या जातीच्या लोकांच्या मताचा व्यापार करतात .त्यातून ते स्वतःचा आर्थिक विकास करतात आपल्या जातीचा मात्र ते कोणत्याही प्रकारचा विकास करत नाही

५) जे तरुण शिक्षण घेत आहे त्यांना त्यांच्या नेत्यांची मानसिकता लक्षात येत आहे म्हणून तरुणांनी शिक्षण

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Inst. of Arts and Socio Sciences NAGPUR

ISSN No. 2394-5990

न घेता पक्षा सोबत जातीय आंदोलनात सहभागी व्हावे असा प्रयत्न राजकीय नेते करतात

६) राजकीय नेते आपल्या जातीच्या लोकांचे भावनात्मक शोषण देखील करतात.

७) जातीव्यवस्था सर्व क्षेत्रातील समान संधीला नाकारते.

संदर्भ :

१) अविनाश डोळस –आंबेडकरी विचार आणि साहित्य, साकेत प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९४ पृष्ठ क्रमांक ३३

२) केशव मेश्राम –डॉक्टर आंबेडकर चिंतन, लोकवाङ्मय गृह मुंबई चौथी आवृत्ती पृष्ठ क्रमांक ६८.

३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक २५.

४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक २०.

५) प्रा. गंगाधर पानतावणे(संपादक)–विचारयुगाचे प्रणेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विचार ग्रंथमाला प्रकाशन १९७८ पृष्ठ क्रमांक ३१.

६) डॉ. भालचंद्र फडके– डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, प्रचार प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९८९ पृष्ठ क्रमांक २२.

७) केशव मेश्राम–डॉक्टर आंबेडकर चिंतन, उ.नि. पृष्ठ क्रमांक २०.

८) प्रा.अशोक गोडघाटे– दलितांचा विचार संघर्ष, अभिजित प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती १९८९, पृष्ठ क्रमांक ३१.


■■■

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Socio Sciences
NAGPUR

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

संशोधक

● वर्ष : ९१ ● मार्च २०२३ ● पुरवणी अंक ३



इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

ISSN No. 2394-5990

८४. राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांचे सामाजिक सुधारणेचे कार्य
– डॉ. रवींद्र पुंजाजी मते ---------- ३४५

८५. लोकनेता राजश्री शाहू महाराज
– प्रा.डॉ.लखपती वासुदेव गायकवाड ---------- ३५०

८६. राजर्षी शाहू महाराजांचे कृषीविषयक धोरण : एक अध्ययन
– प्रा. डॉ. संतोष पां. बनसोड ---------- ३५३

८७. राजर्षी शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे अग्रदूत
– प्रा. डॉ. दीपक सो. वेडे ---------- ३५७

८८. गोलमेज परिषदांमध्ये अस्पृश्यांच्या हक्कासाठी डॉ.आंबेडकरांचा संघर्ष व परिणाम
- प्रा.डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत ---------- ३६२

८९. संगीत प्रेमी राजर्षी शाहू महाराज
- डॉ. बुद्धरत्न लिहीतकर ---------- ३६९

९०. राजर्षी शाहू महाराज म्हणजे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ
- प्रा.संदिप पुंडलिक नन्नावरे ---------- ३७३

९१. रिपब्लिकन पक्ष आंदोलनात नेतृत्वाचा प्रभाव
– डॉ. योगेन्द्र काटकर ---------- ३७७

९२. राजर्षी शाहू महाराज व आर्य समाज
– प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे ---------- ३८२

९३. कलासक्त राजर्षी शाहू महाराज
– प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड ---------- ३८५

९४. अस्पृश्यउध्दारक – राजार्षी शाहू महाराज
– प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे ---------- ३८८

९५. छत्रपति शाहू – लोकतंत्र के स्तंभकार
– डॉ. श्वेता बा. चौधारे ---------- ३९१

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Insts
of Arts and Social Sciences
NAGPUR

ISSN No. 2394-5990

संगीत प्रेमी राजर्षी शाहू महाराज

डॉ. बुद्धरत्न लिहीतकर
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था, नागपूर
bsliheetkar@gmail.com
९८२२९५४६८२, ७०२०९०३६२२

keynote : छत्रपती शाहू महाराज, संगीत, तमाशा, नाटक

प्रस्तावना :

छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक भान अतुलनीय होते. समाज केवळ आर्थिक बळ तसेच सामाजिक विकास यावरच सुखी होईल असे नाही तर सांस्कृतिक जीवनमान सुध्दा आवश्यक आहे. निसर्गाच्या सानिध्यात माणसाला विविध रंग छटा अनुभवण्यासाठी जसे आपल्याला मन आहे तसेच काही कला छंद माणसाच्या अंगी असल्यातर माणसाचे संपूर्ण आयुष्य हे खूप सुखावह होणार यात शंका नाही. विविध कलांमधून समुचित मानव समाज वृद्धिंगत होणार याची जाणीव सुद्धा महाराजांना होती. त्यामुळे अशा विविधतेने नटलेल्या कलांचा आश्रयदाते महाराज म्हणून शाहू महाराज सांस्कृतिक विकासाच्या द्रुष्टीने अनेक कलावंतांना एकत्रित करण्याचे आणि त्यांचा सांस्कृतिक दर्जा उंचावण्यासाठी आपल्या कार्यकाळात महत्वपूर्ण योगदान दिले.

आधुनिक काळामध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्यासारखा मर्मज्ञ, गुणग्राहक आणि रसिक तसेच जाणता राजा देशात शोधून सापडणार नाही. म्हणूनच समकालीन शाहिरांनी शाहूंचे गुणसंकीर्तन केले असून सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे तोंड भरून कौतुकही केले आहे. अभिजात कलाकारांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच सांस्कृतिक जडणघडणीच्या दृष्टीने शाहू महाराजांचे विशेष योगदान कलाकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या गेलेले आहे.

महाराजांनी कलाकारांवर अनेक वेळा धनदौलत उधळण्याचा विषय आपल्याला नवीन नाही. पण ही उधळण किती जाणीवकारक करावी आणि दुसरे असे की केवळ काही हौसे मौजेसाठी, उपभोगण्याच्या उद्देशाने अय्याशीतून नव्हे तर कलावंतांना यथायोग्य मान आणि सामाजिक सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने पालकाच्या भूमिकेच्या अंतर्गत कितपत केले जाते हे पाहिल्यास शाहू महाराजांचा वेगळेपणा दिसून येतो. बाबुराव पेंढारकरांनी हा फरक नेमक्या शब्दांमध्ये व्यक्त केला आहे. कलेचे असे एकही क्षेत्र नव्हते की ज्यात कोल्हापूरच्या कलावंतांनी आपला संपूर्ण विकास करून घेतलेला नव्हता आणि ज्यात कोल्हापूरचे कलावंत अग्रेसर नव्हते ही वास्तविकता नोंदवून ते लिहितात ''शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये कलावंतांचे केशराचे पीक पिकवले त्या मनातून मी नुसता चाललो तर माझ्या सर्वांगावर सुगंध व रंग चढला.''[१]

महाराजांना सर्वच क्षेत्रातील कलावंतांचा नितांत आदर होता आणि त्यांच्या कलेची ते एवढी कदर करत असत की, प्रसंगी कलाकारांमुळे स्वतःचा अपमान सुद्धा सहन करत असत.

शाहू महाराज आपल्याला त्या-त्या विषयाचे ज्ञान व्हावे यासाठी सतत प्रयत्न करायचे. गायन कलेतील बारकावे समजावे आणि मर्म कळावे म्हणून त्यांनी पांडूतात्या ढेरे यांच्या सारखे संगीत जाणकार सोबत ठेवत असत. सांगीतिक ज्ञानाचा उलगडा आपल्याला अपेक्षित आहे ते महाराज मिळविल्याशिवाय राहत नसत.

गोविंदराव टेंभे यांनी जे नाट्यकलावंतांच्या संदर्भात सांगितले आहे तेच अन्य क्षेत्रातील कलाकारांबाबत खरे असावे असे दिसते. टेंबे लिहितात, ''शाहू महाराज कंपनीकडे मधून-मधून येत असत पण त्यांचा आश्रय म्हणजे सुळावरची पोळी. तुमच्या सुख सोयी करून देतील; पण तुमच्या कर्तबगारीची कसोटीही क्षणोक्षणी आजमावतील. उधळपट्टी तर दूरच, पण गैरशिस्त खर्च करायला पैसाच मुळी हाती देणार नाहीत.''[२] यातून महाराजांची आस्था स्पष्ट होते पण संबंधितांनी कठोर परिश्रमातून भव्य दिव्य यश संपादन करून संस्थानाचा लौकिक वाढवावा अशी दूरदृष्टीही दिसून येते. राजांचा दिलदारपण, सूक्ष्मदृष्टी आणि कलाकारांचा त्यांना मिळालेला भरघोस प्रतिसाद या कारणांमुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये सर्व कलादालने भरास आली आणि तिथेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात कला गुणांचे सुवर्णयोग सुरू झाले, असेच म्हणावे लागेल.

कलावंतांची जात-पात धर्मपंथ यांचा शाहू महाराज कधीही विचार करत नसत त्यांच्या अंगी असलेली कला हाच एक कलावंतांचा सन्मान होता. मग तो हिंदू, मुसलमान किंवा ब्राह्मण, महार असा विचार चुकूनही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

सर्वांनाच एका नजरेत बघितल्यास महाराजांचा मोठेपणा 'वय-वंश-धर्म-भाषा यांना न ठाव काही, क्रीडांगणी कलांचा हा भेदभाव नाही' या ग. दि. माडगूळकरांनी आपल्या काव्यपंक्तीत अचूक वर्णलेले आहे. कलावंतांचे मोठेपण जपताना त्यांनी स्वतःचे स्थान आणि अधिकार यांचा कधीही बडेजाव केला नाही.

कलाकार अव्यवहारी असतात उद्याचा विचार करण्याचा हिशेबीपणा त्यांच्याजवळ बहुतेक नसतोच. आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी काही तरतूद केली पाहिजे ही दृष्टी त्यांच्यामध्ये अभाव असतो त्यामुळे परंपरागत आणि वडीलोपार्जीत मिळेल तेच कलावंत जपतात, जगतात सुद्धा आणि यामुळे कुटुंबीयांची खूप हाल होतात. याची जाणीव महाराजांना अचूक होती. अडचणीत सापडलेल्या कलाकारांना त्यांनी आर्थिक मदत करून स्थैर्य मिळवून देण्याचा, त्यांना घर, जमिनी, पेन्शन, नोकरी अशा सुविधा दिल्या ह्या विशेष महाराजांमध्ये दिसून येते.

कोल्हापूर संस्थानामध्ये संगीताची दीर्घ परंपरा आहे कीर्तन, तमाशा, लावणी, दिंड्या, वाघ्या मुरळीची गाणी, लोकसंगीत, ठुमरी, गझल, द्रुपद-धमार अशा विविध संगीत प्रकारांमध्ये सहाशे पेक्षा जास्त कलावंत शाहू महाराजांच्या आधीपासून तिथे वास्तव्य करत होते सावकार, जहागीरदार, राजे रजवाडे वगैरे लोक त्यांना कमी अधिक आश्रय देत. महाराजांचे जनक पिते संगीताचे शौकीन होते. कोल्हापुरातीलच नव्हे तर देशातील पहिली संगीत विषयक संस्था ज्याला म्हणता येईल तो कोल्हापूर गायन समाज १८८३ मध्ये त्यांच्याच पाठबळावर स्थापन झालेली आहे. १८९२ मध्ये स्थापन झालेल्या देवल क्लबला जागा, इमारतीसाठी पैसा, कलावंतांना आश्रय आणि प्रेरणा देऊन खुद्द महाराजांनी उभे केले होते. त्या आधारावरच या संस्थेची निर्मितीच नव्हे तर दरारा संपूर्ण देशभर पसरला होता.

सुविख्यात संगीत मर्मज्ञ एस. ए. कुलकर्णी म्हणतात देशात आज कीर्तीमान झालेले अनेक संगीत घराण्यांच्या गायक गायकांची परंपरा या नगरीतच संवर्धित झालेली आहे आणि त्याचे मूळ प्रणेते शाहू महाराज हेच होते कोल्हापूरच्या महाराजांच्या कृपाप्रसादाने उदयास आलेला देवल क्लब प्रसिद्धीस आला तेव्हा देशातल्या प्रत्येक गायक-गायकेला वाटायचे की आपले गायन देवल क्लब मध्ये व्हावे. जो कलाकार आपली गायन वादनाची कला सादर करू शकला तो देशाच्या किर्तीवलयात रंगू लागला असे उद्गार पवार यांनी काढले.[३]

कोल्हापुरात उत्सवाच्या प्रसंगी खूप दूरचे गायक कलावंत येत असत आणि आपली हजेरी लावत असत. कलावंतांच्या दर्जेदार शास्त्रोक्त संगीत असा गायक-वादक असो की ठुमरीचा वा भजनांचा गायक असो त्याला महाराजांकडून सारखाच सन्मान आणि प्रोत्साहन मिळत असे.

संगीताच्या क्षेत्रातील माऊंट एव्हरेस्ट म्हणून ज्यांचा बॅरिस्टर जयकारां-सारख्या रसिकांनी गौरव केला ते गानमहर्षी अल्लादिया खा साहेब यांना शाहू महाराजांनी १८९५ मध्ये दरबारी गायक म्हणून आणले. त्यांच्या स्वरूपात जयपुर घराण्याच्या गायकीचा महाराष्ट्रात प्रवेश झाला आणि पुढच्या काळात झपाट्याने प्रसारही झाला. अल्लादिया खा हे खास आहे यांना संपूर्ण देशामध्ये नावलौकिक मिळाला. त्यांच्यासोबतच त्यांचे बंधू हैदर खा तीन पुत्र मंदिर खा, भुर्जी खा आणि नसिरुद्दीन खान असे सारे कुटुंबच कोल्हापूर नगरीत वास्तव्यास आले होते. जणू एका प्रतिष्ठित संगीत विद्यापीठाचा भाग कोल्हापूर झाला आहे आणि या विद्यापीठातून बाहेर पडलेल्या अलाद्याखाच्या शिष्य स्नातकांची नावे जरी नजरे समोरून घातली तर त्यांनी संगीत क्षेत्रात केवढी जबरदस्त कामगिरी बजावली याची कोणालाही कल्पना येऊ शकेल. भास्कर बुवा बसले, नथन खा, केसरबाई केरकर, हैदर खान म्हणजे मोगुबाई कुर्डीकर जसदनवाला, शाळीग्राम, निवृत्ती बुवा सरनाईक अशी अखिल भारतीय कीर्तीची कितीतरी बहुमोलाची माणसे संगीत क्षेत्रात होते. संगीत तज्ञ बाबुराव जोशींनी म्हटलेले की अल्लादिया खा साहेबांच्या रूपाने कोल्हापूरला शोभा देणारे नवे लेणेच मिळाले असा प्रचंड बुद्धीचा व प्रतिभेचा गवयांचाही गवई वाग्गेयकार कोल्हापूरला लाभला आहे. त्या कोल्हापूरचे भाग्यच असे म्हणावे लागेल. पवार, जयसिंगराव - ''राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व कार्य'' २००१ पृ. क्रमांक २१८.

१९०१ मध्ये अब्दुल करीम का प्रथमच कोल्हापूरला आले नंतर शाहू महाराजांनी त्यांचे गाणे ऐकले आणि त्यांना भरपूर बिदागी दिली. नंतर खा साहेबाचा मुक्काम सहा महिने कोल्हापूरतच होता. त्यावेळी अवघ्या नऊ वर्षाच्या असलेल्या केसरबाई केरकरांना खा साहेबांनी सहा महिने गाणे शिकवले. अल्लादियाखा यांनी शाहू छत्रपतींच्या सांगण्यावरून सर्वांना भरपूर संगीताचे ज्ञान दिले याच केसरबाईंना एका मैफिली नंतर महाराजांनी असा उत्स्फूर्त आशीर्वाद दिला की त्यांना अखिल भारतीय कीर्ती मिळाली. त्यांचा तो आशीर्वाद पूर्णपणे खरा ठरला. हैदर बक्ष सारंगीये यांच्या सारंगी वादनावर महाराज एवढे प्रसन्न होते की त्यांनी हैदर-बक्ष यांना आपल्या चाकरीत ठेवून घेतले. ते तहयात महाराजांच्या सेवेत होते.

देवासचे प्रसिद्ध गवई रजबअली खा यांचे वडील मुघले खा किराणा घराण्याचे अर्ध्वयू हैदर बक्ष, अब्दुल करीम खान, अंजनीबाई मालपेकर अशा अनेक महान गायिका-गायकांना महाराजांनी आपल्या कोल्हापूरच्या वास्तव्यात ठेवले. निवृत्तीबुवा सरनाईक आणि नूतन गंधर्व आप्पासाहेब देशपांडे यांना संगीताचे धडे दिले. अंजनी मालपेकर या अखिल भारतीय कीर्ती

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ISSN No. 2394-5990

लाभलेल्या बहुभाषी विदुषीच्या गाण्यावरही महाराज बेहद्द लुब्ध होते.

अशा पद्धतीने शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये सर्व घराण्यांच्या थोर कलावंतांची मांदियाळीच भरली होती. महाराजांनी जणू त्या विविध गायकींच्या प्रवाहांचा सुंदर संगमच आपल्या राज्यांमध्ये घडून आणला होता. आपल्या राज्यालाच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राला शास्त्रीय संगीताची गोडी लावण्याचे काम प्रत्यक्षात महाराजांनी केलेले आहे असं म्हणल्यास वावगे ठरू नये.

मराठी कलावंतांची उच्च दर्जाची परंपरा कोल्हापूरच्या संगीत विशवातून पुढच्या काळात निर्माण झाली हे आपल्याला यावरून स्पष्ट होते शास्त्रीय संगीता बरोबरच शाहू महाराजांनी भजन गायक-गायीकांनाही तेवढेच सन्मानित केले. तुकाराम बुवा सरनाईक, पंडितराव करंबळेकर, कृष्णा बागणीकर असे अनेक भजन गायक त्यांच्या काळात उदयास आले.

तमाशा शाहीर, तमासगीर, सत्यशोधक जलसेवाले या लोककलांचा सन्मान सुद्धा शाहू महाराजांनी अत्यंत जाणीवेने केला. उच्च वर्णीय कलाकारांच्या तुलनेत तळागाळातल्या कलावंतांचे स्थान खालचे मानन्याची वृत्ती समाजामध्ये दिसायला लागली होती. तिला छेद देण्याचे मौलिक धोरण महाराजांनी अवलंबिले होते. लोककला म्हणून ज्यांचा कधी उपेक्षा किंवा कुत्सीत भावाने उल्लेख केला गेला होता. त्या कथीत कलाकारांची खऱ्या अर्थाने विशुद्ध कला असून त्यांच्याशी जीवाभावाचे नाते ठेवून असणाऱ्या उच्चभ्रू कला सशक्तपणे वाढू शकतात अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी स्वतःला जाणीवपूर्वक या लोकपरंपरांशी जोडून घेतले. त्यांची साधी जीवन सरणी, त्यांचा मराठमोळा आहार, गळ्यात कवड्यांची माळ आणि मुखात खेडूतांची भाषा हे सारे त्यात जोडून घेण्याच्या प्रक्रियेचाच भाग होते. सामाजिक क्षेत्रात विषमतेची उतरण मोडून जनसामान्यांना मान मरातब देण्याचा हा त्यांचा प्रयत्न होता. त्याचेच प्रत्यंतर कथीत लोककलांना सहानुभूती पूर्ण प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने अनेक धोरणे महाराजांनी आपल्या कार्यकाळात कार्यरत केले. लोककल्याणाचे आणि सुधारणेचे लोन जर रयतेच्या मनात खोलपर्यंत पोहोचवायचे असेल तर ते त्यांच्या भाषेतून आणि त्यांच्या आवडणाऱ्या कला गुणांच्या वापरातूनच शक्य होऊ शकेल असे महाराजांना वाटत. त्यामुळेच शाहीर, तमासगीर वगैरे लोक रंजनकार कलावंतांना त्यांनी जवळ आश्रय दिला. तमाशाला कलासापेक्ष स्वरूप देऊन त्यांचे सत्यशोधक जलसा रूपांतर केले. याचे श्रेय अर्थातच महाराजांना जाते. या संस्थानात शाहिरीची समृद्ध परंपरा शिवकाळाच्याही आधी लाभले होते. कलगीतुऱ्याचे आखाडे तेथे फार जुने होते. शाहू महाराजांना लोककलांमध्ये कमालीचा रस होता. तर दुसऱ्या बाजूने शाहिरांना शाहूच्या स्फूर्तीदायक चरित्राचे संमोहन होतेच. त्यांच्या विविध क्षेत्रातील पराक्रमांचे गुणगान शहरांच्या प्रतिभा फुलून येत असेल. शाहू छत्रपती लोकांवर करत असलेली डोंगराएवढी माया, त्यांचे आकाश एवढे मन, त्यांची अभिजात गुणग्राहकता, त्यांची धाडसी सुधारकता इत्यादी अनेक विषयांनी समकालीन शहिरांचे पोवाडे ओतप्रोत भरलेले दिसून येतात. लहरी हैदर साहेब, जंगली मुजावर, शाहीर विठ्ठल बिराजी डोणे, रामचंद्र नारायण माळी, आबा माळी, शाहीर भाऊ पाटोळे, भिवडीकर शाहीर रामचंद्र दळवी खेडकर, शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर मारुती सकटे असे अनेक शाहीर महाराजांच्या उदार आश्रयाचा एक भाग आहे. त्यांच्यापैकी लहरी हैदर हे कलगीवाले, आबा माळी तुरेवाले, रामचंद्र नरहर माळी कलगीशिरपेजवाले म्हणून विख्यात होते. शाहीर आपापल्या डफ तुंतुनांवर ही चिन्हे मोठ्या अभिमानाने मिरवत. लहरी हैदर साहेब हे महाराजांच्या विशेष मर्जीतील मानले जातात. त्यांना राजर्षी आखाडा बांधण्यास मदत दिलीच. शिवाय त्यांचा संपूर्ण योगक्षेमही ते चालवत असत. राजर्षी यांनी कित्येकांना शेलापागोटे आणि रोख बक्षीस दिल्याचे उल्लेख सापडतात. चव्हाण, शि. रा. आणि मगदूम, विजयकुमार - ''छत्रपती शाहू आणि शाहिरी परंपरा'' १९७५ पृ. क्रमांक ३८०.

शाहीर तात्या सावळजकर आणि लावणी सम्राट पठ्ठे बापूराव यांना आपल्या सोनताई त्यांच्या मुक्कामी खास बोलवून महाराजांनी त्यांच्या कलेचा गौरव केला. ''मोहना बटाव'' हा वग तर महाराजांना इतका आवडला होता की तो ऐकल्यावर त्यांनी कलावंतांना जरीपटका आणि एक हजाराची थैली देऊन त्यांचा सत्कार केला.

निष्कर्ष :

अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांच्या ठिकाणी असलेल्या अभिजात रसिकतेमुळे संगीत, नाटक, तमाशा इतरही कलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. बरीच गुणीजान माणसे जनसामान्यांसमोर आली आणि त्यांनी देशव्यापी कीर्ती संपादित केली. ज्या काळात कलावंतांना फारशी सामाजिक प्रतिष्ठा नव्हती, घरच्या लोकांचा आणि आप्तस्वकीयांचा पाठिंबा नव्हता, कोणत्याही कलेला वाहून घ्यायचे तर घरदार सोडून बाहेर पडण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता त्या काळात शाहू महाराजांनी कला आणि इतरही क्षेत्रांचा यथोचित सन्मान मानसिक आधार, आर्थिक आधार देऊन या सर्व कलासक्त गोष्टींना पुरस्कृत केले. त्यामुळे जो परिणाम आज आपल्यासमोर आहे तो केवळ महाराजांमुळेच हे निर्विवाद आहे.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

संदर्भ :

१. पेंढारकर बाबुराव, – केशराचा मळा राशागौग्रं, १९७६ पृ. ५५३.

२. टेंबे, गोविंदराव– रसिला राजा राशागौग्रं,१९७६,पृ.५३९.

३. पवार, जयसिंगराव – राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व कार्य २००१ पृ. क्रमांक २१७.

४. kanbarkar R.K. - Glimpses of Rajarshi Shahu Maharaj-2022

५. देशपांडे बाबुराव, – नाट्यप्रेमी राजा १९७६

■■■

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Socia Science.
NAGPUR

परामर्श

रजि. नं. ३५६५३/७९



तत्त्वज्ञान विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११ ००७
महाराष्ट्र (भारत)

ISSN 2320-4478
UGC CARE Listed

परामर्श

खंड ४१ अंक ३-४
नोव्हेंबर २०१९ ते एप्रिल २०२०
कार्तिक ते मार्गशीर्ष - चैत्र शके १९४१-४२
प्रकाशन - फेब्रुवारी, २०२३



तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकाशन

परामर्श

तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकाशन

संस्थापक : सुरेंद्र बारलिंगे (१९१९- १९९७)
संपादक : प्रदीप गोखले
सहयोगी आणि प्रशासकीय संपादक : श्रीधर आकाशकर

संपादक मंडळ
दीप्ती गंगावणे
मीनल कातरणीकर
श्रीनिवास हेमाडे
हरिश्चंद्र नवले

सल्लागार मंडळ
सदानंद मोरे
मंगला चिंचोरे
वैजयंती बेलसरे
नागोराव कुंभार
प्रभाकर देसाई

संपादकीय सहाय्य : सुनील राऊत

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई यांचेकडून अनुदान प्राप्त झाले आहे. मात्र या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

प्रसिद्धीसाठी पाठवायचे लेख व इतर सर्व व्यवहार यासाठी संपादक, परामर्श, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७ यांना लिहावे.

वर्गणी रोखीने संपादक, परामर्श, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे ४११००७ या पत्त्यावर पाठवावी. मात्र चेकने किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठविल्यास चेक किंवा ड्राफ्ट 'वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' या नावाने काढावा व तो 'संपादक, परामर्श' यांच्या पत्त्यावर पाठवावा. अंक न मिळाल्याची नोंद अंक प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत आमच्या कार्यालयात केल्यास अंक शिल्लक असल्यास पाठविला जाईल.

परामर्शचे सुधारित वर्गणी दर

त्रैवार्षिक वर्गणी	संस्थांसाठी	रु. २०००/-
	व्यक्तींसाठी	रु. १२००/-
वार्षिक वर्गणी	संस्थांसाठी	रु. ८००/-
	व्यक्तींसाठी	रु. ५००/-
मागील खंडाची किंमत	संस्थांसाठी	रु. १०००/-
	व्यक्तींसाठी	रु. ६००/-
एका अंकाची किंमत	संस्थांसाठी	रु. २५०/-
	व्यक्तींसाठी	रु. १५०/-

जाहिरातीचे नवीन दर

अर्धपानी जाहिरात रु. ३००/- प्रती अंक आणि रु. ९००/- ४ अंक
पूर्ण पान जाहिरात रु. ५००/- प्रती अंक आणि रु. १५००/- ४ अंक

परामर्श

परामर्श, खंड ४१, अंक ३-४, (नोव्हें. २०१९ ते एप्रिल २०२०)
प्रकाशन : फेब्रुवारी, २०२३

अनुक्रमणिका

अंक	लेखक	लेख	पृ. क्रमांक
१.	राजेसाहेब मारडकर	'सीएसआर'च्या संदर्भात, 'आचारसंहिता आणि कॉर्पोरेट विश्व' यांतील संबंधांची मीमांसा	१
२.	श्रीकांत चवरे	विद्यमान राजकीय पर्यावरणात महात्मा गांधीजींच्या तात्त्विक विचारांची व्यवहारिकता (एक चिकित्सक अध्ययन)	१४
३.	अमन बगाडे	संप्रेषण (संवाद) कौशल्यातील नीतिशास्त्राची भूमिका : बुद्धांची 'सम्यक् वाक्' शिकवण	३१
४.	ऋचा कुलकर्णी	नैतिक ज्ञानशास्त्र आणि नैतिक दाव्यांचे समर्थन	४०
५.	शर्मिला वीरकर	दिके व जेके	५४
६.	श्रीधर आकाशकर	भगवद्गीतेवरील टीका आणि महानुभाव : काही विचार	५८
७.	तुकाराम सोपान जंगले	पंचदशीचे मराठी भाषांतर : एक अध्ययन	६३
८.	भारती बापूसो पाटील	स्वास्थ्यसाधन - हठयोग	६५
९.	सचिन राजपूत	महाराष्ट्रातील संतांचे सामाजिक योगदान	८८
१०.	श्रीनिवास हेमाडे	चिनी तत्त्वज्ञान समजून घेताना - तीन मूलभूत सिद्धान्त	१०६

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

परामर्शच्या मालकी हक्क, प्रकाशन वगैरेंबाबत

फॉर्म ४

१.	प्रकाशन स्थळ	:	तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७
२.	प्रकाशन कालावधी	:	त्रैमासिक
३.	मुद्रकाचे नाव व पत्ता	:	कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७ राष्ट्रीयता : भारतीय
४.	प्रकाशकाचे नाव, पत्ता आणि राष्ट्रीयत्व	:	प्रा. श्रीधर आकाशकर, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७ राष्ट्रीयता : भारतीय
५.	संपादकाचे नाव व पत्ता	:	प्रा. प्रदीप गोखले, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७ राष्ट्रीयता : भारतीय
६.	नियतकालिकाची मालकी ज्यांच्याकडे आहे, त्या व्यक्तीचे/संस्थेचे नाव व पत्ता	:	तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-४११००७

मी, श्रीधर आकाशकर; याद्वारे प्रकट करतो की, वर दिलेली माहिती खरी आहे.

श्रीधर आकाशकर

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Inst...
of Arts and Social Scienc...
NAGPUR

'सीएसआर'च्या संदर्भात, 'आचारसंहिता आणि कॉर्पोरेट विश्व' यांतील संबंधांची मीमांसा

प्रस्तावना

व्यक्ती, समाजजीवन आणि व्यवस्थेच्या आचरणाची मीमांसा हा आपल्या तत्त्वचिंतनाचा अविभाज्य असा भाग आहे. व्यक्ती असो वा समूह, आचरणाची मीमांसा करतच उत्तरोत्तर विकसित होत असतो. याअर्थाने तत्त्वज्ञान, तत्त्वचिंतन हा जीवनाचा एक भाग आहे. 'It is impossible for man to live without a Philosophy.'[१] अर्थात जीवनातील मूलभूत घटकांचे, दैनंदिन घटकांचे तत्त्वचिंतन केल्याशिवाय मनुष्य अंतिम ध्येयाप्रत पोहोचू शकत नाही. त्याचबरोबर तत्त्वज्ञानाच्या अॅकॅडमिक स्वरूपाचा विचार केला, तर आपल्या लक्षात येईल की, 'तत्त्वज्ञान हे सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे', असे म्हटले जाते. त्यामुळे व्यक्तीच्या आचरणाचा आदर्शात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करणारे नीतिशास्त्र (Ethics), अथवा आचारसंहिता (code of conduct) हेसुद्धा तत्त्वचिंतनाचे एक क्षेत्र आहे.

वरीलप्रमाणे विचार केला; तर नीतीची संकल्पना ही व्यापार, उद्योग, कंपनी, व्यवसाय-क्षेत्रालाही लागू होऊ शकते. एका विशिष्ट उद्देशाने एकत्रित आलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे कंपनी होय. उद्योग, व्यापार, व्यवसाय ह्या कार्पोरेट विश्वाशी संबंधित संकल्पना आहेत. साहजिकच कर्तव्य, जबाबदारी, प्रत्येक घटकाचे हित, नफा इत्यादी गोष्टींचा विचार करता, व्यक्ती वा व्यक्तींच्या समूहाच्या आचारसंहितेच्या अनुषंगाने चिंतन आवश्यक ठरते. या ठिकाणी आचारसंहिता आणि उद्योग, व्यापार-जगत यांच्यातील संबंधांची सविस्तर चर्चा प्रस्तुत आहे. हे करत असताना नीती (ethics) अथवा आचारसंहिता (code of conduct) आणि उद्योग, व्यापार, व्यवसाय-जगत (corporate world) यांचे स्वरूप आणि यांच्या संबंधाच्या अनुषंगाने नैतिक जगतामध्ये

आवश्यक असलेली संकल्पना 'सीएसआर' (CSR अर्थात Corporate Social Responsibility) अर्थात 'व्यवसायिक सामाजिक उत्तरदायित्व' या संकल्पनांच्या संबंधाचे विश्लेषण होणे गरजेचे आहे.

'सीएसआर' ही कॉर्पोरेट विश्वामध्ये नैतिक-सामाजिक संबंध अभिव्यक्त करणारी एक संकल्पना आहे. नैतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला, तर आपल्या लक्षात येते की, उद्योगव्यापार विश्व आणि सामाजिक उत्तरदायित्व यांच्यात अतुट असा संबंध आहे. प्राचीन काळातील उद्योग-विश्वाचा विचार केला, तर या क्षेत्रातील सामाजिक उत्तरदायित्वाची अनेक रूपे जसे- उदारपणा, दानशूरपणा, इत्यादींबाबतची अनेक उदाहरणे आपणास सांगता येतील. एखाद्या उद्योग-समूहाने उभारलेला दवाखाना, किंवा बांधलेली शाळा, महाविद्यालयासाठी दानरूपात दिलेल्या जमिनी, इत्यादी हे सर्व आपण समाजाप्रतिचे काही देणे लागतो, या भावनेचे प्रतीक आहेत. असा हा उदात्त इतिहास, वारसा या संकल्पनेला आहे. यामुळेच आज ही संकल्पना उद्योगजगताचा महत्त्वपूर्ण भाग आहे. याचे अधिक विवेचन पुढे केले जाणार आहे. या लेखातील मूळ तीन संकल्पना, नीती (ethics) अथवा आचारसंहिता (code of conduct), उद्योगव्यापार, व्यवसाय-जगत (corporate world) आणि 'सीएसआर' (CSR अर्थात Corporate Social Responsibility) यांचा पुढे क्रमाक्रमाने विचार करता येईल.

नीतिशास्त्राचे संक्षिप्त स्वरूप

तत्त्वज्ञानाची एक शाखा 'नीतिशास्त्र' ही व्यक्तिआचरणविषयक सर्वच विषयांचे विश्लेषण करत असते. व्यक्तीच्या व्यावहारिक आणि पारमार्थिक जीवन विकासासाठी नीतिशास्त्र आचरणविषयक विशिष्ट आकार, नियम पुरवत असते. नीतिशास्त्र या शब्दातील 'नीती' या शब्दाने जो अर्थ व्यक्त होतो तो - ''नीती म्हणजे असे नियम की ज्यांचे पालन केल्याने माणसाचे लौकिक आणि अलौकिक अथवा पारलौकिक कल्याण होईल, तसेच समाजात स्थैर्य आणि संतुलन राहील, शिवाय व्यक्ती व समाज यांचा सर्व दृष्टींनी विकास (अभ्युदय) होईल व विश्वात शांती नांदेल.[२]'' 'नीती' या शब्दाने आचरणाशी संबंधित लौकिक आणि अलौकिक असे दोन्ही अर्थबोध होत असले, तरी या ठिकाणी केवळ लौकिक, व्यवहारिक अर्थच प्रस्तुत आहे. अशाप्रकारे नीतीचे,

व्यक्तीच्या/व्यक्तिसमूहाच्या आचरणाचे निश्चित असे मापदंड असावेत; जेणेकरून त्यांच्या अनुसरणाने सर्वांचा विकास होईल.

'नीतिशास्त्र' आणि 'आचारसंहिता' हे दोन्ही मराठी पर्यायी शब्द म्हणून वापरले जातात. नीतिशास्त्र हा शब्द साधारणत: अकॅडमिक अर्थाने वापरला जातो, तर आचारसंहिता हा शब्द साधारणपणे व्यावहारिक अर्थाने वापरला जातो. तसेच नीतिशास्त्रांतर्गत नैतिक विवेचनांचा विचार केला, तर आपल्या लक्षात येते की, संपूर्ण नैतिक चिंतनाला आपण साधारणत: तीन भागांत विभागू शकतो - 'आदर्श नीतिशास्त्र', 'अतिनीतिशास्त्र' आणि 'उपयोजित नीतिशास्त्र'. या तिन्ही शाखांचा अभ्यास अकॅडमिक स्तरावर आणि त्या ज्ञानाच्या उपयोजनाच्या बाबतीत व्यावहारिक स्तरावर विचार केला जातो. या तीनपैकी उपयोजित नीतिशास्त्राला, 'व्यावहारिक नीतिशास्त्र' असेही म्हटले जाते. वरील तिन्हींच्या चिंतनातून विभिन्न घटकांशी संबंधित आचारसंहिता उदयास येत असते. विभिन्न प्रकारच्या उद्योग-व्यवसायाशी निगडित असलेली आचारसंहिता हीसुद्धा उपयोजित नीतिशास्त्रात चर्चिली जाते. असे असले तरी, या सर्वांचा पाया म्हणजे आदर्शी आणि अतिनीतिशास्त्रीय चिंतन आहे, हे विसरता येणार नाही. त्याचे थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे करता येते -

आदर्शी नीतिशास्त्र (Normative ethics): आदर्शी नीतिशास्त्र व्यक्तींच्या आदर्शांचा विचार करते, आचरणाच्या आदर्शांचा विचार करते. याअनुषंगाने आदर्शी नीतिशास्त्राचे विश्लेषण हे परिणामवादी नीती (consequentialist ethics), कर्तव्यवादी नीती (deontologist ethics) आणि मूल्यवादी नीती (value ethics) अशा तीन प्रकारांत मोडते. या तीन प्रकारांपैकी दुसरे दोन प्रकार आपणास सामाजिक उत्तरदायित्वाकडे (social responsibility) घेऊन जातात. प्रत्येक व्यक्ती अथवा व्यक्तिसमूहाच्या कृतीचे मूल्यांकन हे कर्तव्यवादी आणि मूल्यवादी सिद्धांतांच्या आधारावर केले गेले पाहिजे. त्यामुळे कर्तव्य भावनेचा, सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेचा विकास यातून होतो.

अतिनीतिशास्त्र (Metaethics): नैतिक संकल्पनांचे विश्लेषण करणे आणि वास्तवार्थांचा वेध घेण्याचे कार्य अतिनीतिशास्त्र करते. या ठिकाणी एक प्रकारे नैतिक विधान, संकल्पना यांच्या भाषिक विश्लेषणाचाच प्रयत्न केला जातो, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Inst
of Arts and Social Scien
NAGPUR

उपयोजित नीतिशास्त्र (Applied ethics): अगदी अलीकडच्या काळात या ज्ञानशाखेचा उदय झालेला आहे. आचरणविषयक निकषांचे, नैतिक संकल्पनांचे ज्ञान दैनंदिन जीवनातील व्यावहारिक समस्या सोडवण्यासाठी कितपत उपयुक्त आहे, हे अत्यंत महत्त्वाचे असते. अर्थातच प्राप्त ज्ञानाचे उपयोजन दैनंदिन नैतिक प्रश्न, समस्या सोडवण्यासाठी होणे आवश्यक आहे.

उपयोजित नीतिशास्त्राचा विचार केला, तर आपल्या लक्षात येते की, Professional Ethics, Business Ethics, Bioethics, Abortion, Euthanasia, Law, Leadership, Environmental ethics, War, Journalism etc. यांसारखे घटक या शास्त्राची विषयवस्तू आहे. वरील प्रकारच्या समस्या ह्या मानवी दैनंदिन जीवनाचा भाग आहेत. या समस्यांशी प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्यातरी रूपात तोंड द्यावेच लागते. वरील सर्व घटकांपैकी उद्योगव्यापारविषयक नीतिशास्त्र यांमध्ये अनेक व्यक्तींचे हितसंबंध असतात. एखादी कंपनी जर आपल्या कर्तव्यापासून पळ काढत असेल किंवा त्याचे पालन करत नसेल, तर अनेक समस्या निर्माण होतात. जसे कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संबंधांबाबतच्या समस्या असतील वा पर्यावरणाशी संबंधित समस्या असतील किंवा कंपनी आणि समाज यांच्या बाबतीतील समस्या असेल, तर या समस्यांची उकल करण्याचे कार्य उपयोजित नीतिशास्त्र करत असते.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजात राहतो आणि उदरनिर्वाहासाठी काही ना काही तरी व्यवसाय, उद्योगव्यापार करत असतो. हे करत असताना स्वाभाविकपणे त्याचा समाजातील इतर घटकांशी संबंध येत असतो. हे संबंध परस्परपूरक, परस्परावलंबी, परस्परसापेक्ष असतात. उद्योग-व्यापारांचा विकास होण्यासाठी, त्यामध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींच्या जीवन-विकासासाठी, व्यक्तिगत आणि सार्वजनिक कल्याणासाठी त्याला काही लिखित आणि अ-लिखित अशा व्यवस्थानिर्मित अथवा समाजनिर्मित नियमांचे पालन करावे लागते. हे नियम म्हणजे एक प्रकारचे व्यक्तीच्या अथवा समूहाच्या आचरणाचे नियम असतात. यालाच आचारसंहिता (code of conduct) असेही म्हटले जाते. याविषयी साधारणपणे असे म्हटले जाते की, आचारसंहितेचा सर्वप्रथम प्रयोग निवडणुकीच्या संदर्भात राजकीय पक्ष आणि व्यक्तींच्या आदर्श आचरणाच्या

अनुषंगाने वापरला जात होता[३], परंतु कालांतराने आचारसंहितेने व्यक्ती आणि समाजजीवन यांच्याशी संबंधित असलेल्या जवळजवळ सर्वच क्षेत्रांत प्रवेश केल्याचे आपल्या लक्षात येते. वर्तमानकालीन व्यवस्थाबद्ध जीवनप्रणालीत तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आचारसंहिता ही त्या त्या क्षेत्राचा अविभाज्य असा भाग बनलेली आपणास दिसून येते. त्याला उद्योग, व्यापार, कंपनी क्षेत्रसुद्धा अपवाद नाही, ही आजची वास्तविकता आहे. वाढते औद्योगिकीकरण, व्यापारविश्व, कंपनीशी संबंधित असलेल्या विश्वाने तर निर्मित आचारसंहितेचे पालन करणे हे अभिप्रेत असते.

उद्योगव्यापार विश्वाचे संक्षिप्त स्वरूप

आधुनिकता, माहितीतंत्रज्ञान यांनी प्रभावित असलेल्या सद्य:कालीन मानवी जीवनात विशेषत: उद्योगजगताशी संबंधित Facebook, Google, Microsoft, Reliance, Wipro, Walmart, Flipcart, Amezon, Byjus, Tata, Bajaj, Mahindra. ICICI, HDFC,... इत्यादी नावे सर्वज्ञात आहेत. या सर्व कंपन्यांचे कार्यक्षेत्र हे भिन्न आहे. या सर्व कंपन्या वस्तू, सेवा पुरवण्याचे कार्य करतात. या आणि यांसारख्या अनेक कंपन्यांमध्ये अनेक संघटक कार्यरत असतात. अगदी डायरेक्टर, बोर्ड ऑफ डायरेक्टर, इस्टॅब्लिशमेंट, प्रॉडक्शन मॅनेजरपासून सर्व्हिस-मॅनपर्यंत अनेक व्यक्ती यामध्ये सहभागी असतात. त्यामुळे कोणत्याही कंपनीचा विकास, नफा-तोटा, इत्यादी हे त्या उद्योगातील सर्व संघटकांच्या कार्यक्षमतेवर, त्यांच्यातील कर्तव्यनिष्ठा, विश्वसनीयता इत्यादींसारख्या घटकांवर अवलंबून असतो. एखाद्या उद्योगातील प्रत्येक घटक जर निर्धारित कार्य संपूर्ण कार्यक्षमतेने, कर्तव्यभावनेने आणि न्यायपूर्ण भावनेने कार्यरत असेल, तर उद्योग-व्यवसाय भरभराटीस येतात. पुढे त्याचे सकारात्मक परिणाम सर्व घटकांपर्यंत पोहोचत असतात.

प्राचीन काळापासूनच उद्योग, व्यापार, व्यवसाय हे व्यक्ती आणि व्यक्तिसमूह जीवनाचे अत्यंत महत्त्वपूर्ण असे घटक आहेत. देशाच्या आर्थिक विकासाचे आणि व्यक्तींच्या उदरनिर्वाहाचे एक साधन म्हणून याकडे पाहिले जाते. या घटकांशी संबंधित एक स्पष्टीकरण अगदी संक्षिप्तरूपात या ठिकाणी करणे आवश्यक आहे, ते असे की, व्यवसाय (Profession) आणि उद्योग (Business), व्यापार (Trade), कंपनी, हे शब्द पूर्वी भिन्न-भिन्न अर्थाने वापरले

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

जात असत. अर्थार्जन हा व्यवसायाचा भाग असला, तरी 'सेवा' हा मुख्य उद्देश त्याठिकाणी होता. मात्र उद्योग, व्यापार, कंपनी यांचा मुख्य उद्देश नफा मिळवणे हा होता. पूर्वी आचारसंहिता ही केवळ व्यवसायालाच लागू होती; त्याचा उद्योग, व्यापाराशी फारसा संबंध मानला जात नव्हता, परंतु सद्य:स्थितीत आचारसंहिता हा प्रोफेशन, बिजनेस, ट्रेड, कंपनी इत्यादी सर्व घटकांचा अविभाज्य भाग बनलेला आहे. त्यामुळे अर्थार्जनाबरोबरच सामाजिक उत्तरदायित्व, कर्तव्य इत्यादी घटक वरील प्रकारच्या कार्पोरेट विश्वाचा अविभाज्य भाग बनलेले आहेत. उद्योग-व्यवसायामध्ये नीतीचे अर्थात आचारसंहितेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. वरील प्रकारच्या व्यक्तिसमूहातील आंतरसंबंध महत्त्वाचे असून त्यानुषंगाने विशिष्ट प्रकारच्या नियमावलीचे सर्वांनाच पालन करावे लागते. त्यानुषंगाने 'सीएसआर' हा आचारसंहितेचा भाग आहे. त्याचे पालन करणे त्या त्या उद्योगसमूहाचा महत्त्वाचा घटक आहे.

'सीएसआर'चे स्वरूप

मनुष्य हा समाजात राहत असतो. त्याचा मानसिक, सामाजिक विकास समाजाच्या माध्यमातून होत असतो. त्याच्या अनेक गरजांची पूर्तता ही समाजाकडूनच होत असते. कुटुंब, मित्र, परिवार, गाव, मोहल्ला ही सर्व समाजाचीच भिन्न-भिन्न रूपे आहेत. मनुष्याच्या गरजांची पूर्तता या समाजरूपांकडून होत असते. समाजच त्याला जीवन जगायला शिकवत असतो. याअर्थाने विचार केला; तर मनुष्य हा समाजाचा ऋणी असतो, तो समाजाचे देणे लागतो. जेव्हा तो पूर्णावस्थेत येतो, विकसित अवस्थेत येतो; तेव्हा समाजाने केलेल्या ऋणांची परतफेड करणे, हे त्याचे कर्तव्य असते. ती त्याची सामाजिक जबाबदारी, उत्तरदायित्व असते. अशाच प्रकारची जाणीव ही 'सीएसआर' अर्थात व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाच्या धोरणात असते.

मनुष्याला विकसित करण्यात ज्याप्रमाणे समाजाचा सहभाग असतो, अगदी त्याचप्रमाणे एखादा उद्योग-व्यवसाय विकसित करण्यासही समाज हा साहाय्यभूत असतो. एखादा उद्योग अथवा कंपनी म्हणजे विशिष्ट उद्देशासाठी एकत्र आलेल्या अनेक व्यक्तींचा समूह असतो. कंपनीत काम करणारी व्यक्ती, कंपनीचा डायरेक्टर आणि समाज हे त्याचे भागधारक असतात. त्यामुळे अधिकाधिक नफा मिळवणाऱ्या कंपन्यांची ही नैतिक, सामाजिक जबाबदारी

असते की, त्यांनी समाजाच्या विकासाचे कार्य करावे. दानशूर व्यक्ती आपल्याकडे असलेल्या संपत्तीचा काही हिस्सा समाजकार्यासाठी, समाजविकासासाठी वापरतात. मग त्यामध्ये भूदान, पैसादान यांसारखे सामाजिक कार्य केले जाते. या भावनेतूनच अलीकडच्या काळात अनेक प्रकारचे उद्योग-व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांना, त्यातही अधिकाधिक नफा मिळवणाऱ्या कंपन्यांना समाजाच्या हिताचा, गरजांचा, विकासाचा विचार करावा लागतो. उद्योगाचा विकास या समाजघटकांवर अवलंबून असतो. एवढेच नाही, तर एखाद्या उद्योगाविषयीची विश्वसनीयता, नीतिमत्ता ही त्या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या कार्यातून प्रतीत होत असते.

जवळजवळ सर्वच कंपन्यांना पर्यावरणातील नैसर्गिक संसाधनांची आवश्यकता असते. अनेक प्रकारच्या वनस्पती या कंपन्यांसाठी अनेक प्रकारची उत्पादने तयार करण्यासाठी हवी असतात. उदा. एखादा साबण बनवण्यासाठी किंवा एखादी टुथपेस्ट बनवण्यासाठी कंपनीला पर्यावरणावर अवलंबून राहावे लागते. एकाअर्थाने कंपनीसाठी लागणारी सर्व संसाधने ही निसर्ग, पर्यावरणाकडून मिळत असतात. या सर्व नैसर्गिक, पर्यावरणीय संसाधनांवर समाजाचाही तेवढाच अधिकार असतो, हे विसरता कामा नये. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा नैसर्गिक साधनसंपत्तीवर तेवढाच अधिकार असतो. ही सर्व संसाधने कंपनी आपल्या फायद्यासाठी, नफा मिळवण्यासाठी वापरते; तेव्हा त्यांनी मिळवलेल्या नफ्यातून समाजाच्या विकासाच्या काही योजना राबवणे, हे कंपनीचे कर्तव्य ठरते. अनेक कंपन्या पूर्वीपासूनच सामाजिक उत्तरदायित्व निभावत आहेत. मात्र आता त्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाल्याने ती सर्वांची कायदेशीर जबाबदारी झालेली आहे. 'सीएसआर' बंधनकारक करणारा भारत हा पहिला देश आहे.[४] 'सीएसआर' ही समाजाचे देणे फेडण्याची कृती आहे, त्यामुळे उद्योजकांनी या धोरणाच्या माध्यमातून समाजकल्याणात खारीचा वाटा उचलले, हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे.

'सीएसआर'च्या बाबतीत कायदेशीर बंधनासोबतच आंतरिक आणि आत्मिकबंधन, स्वयंनियमन (self regulation) हे अधिक प्रभावी असते, असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही. प्राचीन काळात मोठे उद्योजक आणि [illegible] यांच्याकडून अशाप्रकारच्या कृती केल्या जात असत. त्याकरिता

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

त्यावेळी कोणत्याही प्रकारचा कायदा अस्तित्वात नव्हता. स्वयंप्रेरणेतून या सर्व गोष्टी त्या काळी घडत असत, हे या ठिकाणी महत्त्वाचे आहे. आधुनिक काळात मात्र वरीलप्रमाणे समाजविधायक कृती करणे औद्योगिक समूहांसाठी कायद्यानेही बंधनकारक करण्यात आलेले आहे.

भारतीय कॉर्पोरेट व्यवस्था आणि 'सीएसआर'

उद्योग, व्यापार, औद्योगिक कंपनी हे भारतीय अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वपूर्ण असा भाग आहेत. त्यांच्या संचालन आणि व्यवस्थापनासाठी भारत सरकारने काही कायदे केलेले आहेत. त्यातील The Companies Act 2013 या कायद्याविषयी आणि त्यातील आपल्या चिंतनाशी संबंधित असलेल्या तरतुदींचा विचार या ठिकाणी करता येईल. कंपनी ॲक्ट 2013 (The Companies Act 2013)मधील प्रकरण नऊ आणि सेक्शन 135मध्ये 'सीएसआर' (Corporate Social Responsibility) अर्थात 'व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व' याविषयी स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेली आहे. ज्या कंपनीची आर्थिक वर्षातील संपत्ती 500 कोटी आहे किंवा ज्या कंपनीची आर्थिक वर्षातील उलाढाल ही 1 हजार कोटींची आहे किंवा ज्या कंपनीचा आर्थिक वर्षातील निव्वळ नफा हा जर 5 कोटींचा असेल, तर अशा कंपनीला 'सीएसआर' बाबतचे धोरण राबवावे लागते.[५] कंपनीचे समाजाप्रति असलेल्या कर्जाच्या परतफेडीच्या कार्याचा हा एक भाग आहे. ज्या समाजात आपण राहतो, ज्या समाजामुळे आपणास, आपल्या कंपनीला फायदा होतो, त्या समाजाप्रति आपलीही काही कर्तव्यं, उत्तरदायित्व असते. त्या उत्तरदायित्वाचा एक भाग म्हणून कंपन्यांना अशाप्रकारची धोरणं राबवावी लागतात.

वर उल्लेख केल्याप्रमाणे निकष, ज्या कंपन्यांना लागू होतात; त्या कंपनीमध्ये 'सीएसआर' कमिटी स्थापन केलेली असते. ही कमिटी मागील तीन वर्षांचा सरासरी नफा काढते. या सरासरी नफ्याच्या 2 टक्के हिस्सा[६] हा 'सीएसआर' धोरणासाठी वापरावा, अशाप्रकारची शिफारस ही कमिटी कंपनीच्या बोर्डाला करते. 2 टक्के हिस्सा ही कायदेशीर तरतूद आहे. एखादी कंपनी यापेक्षा अधिक हिस्सा अशाप्रकारच्या कार्यासाठी वापरू शकते. ते त्यांच्या नैतिक कर्तव्य, धर्मादाय अर्थात चॅरिटीचा भाग आहे. अशाप्रकारे कमिटीने केलेल्या

शिफारशीनुसार कंपनी हा निधी कोणत्या प्रकारच्या सामाजिक कार्यासाठी वापरायचा, याचे निर्धारण करते आणि त्यानुसार समाजाच्या विकासाची नैतिक सामाजिक जबाबदारी उचलली जाते.

'सीएसआर' धोरणांतर्गत अपेक्षित असलेल्या ॲक्टिव्हिटी

वर्तमानकालीन व्यवस्थेत 'सीएसआर' हा सर्व कंपन्यांचा एक अविभाज्य भाग आहे. या धोरणाच्या अंतर्गत कंपन्यांना सामाजिक उत्तरदायित्व म्हणून समाजाकरिता काही कार्ये करावयाची असतात. ती जनकल्याणाची कोणकोणती कार्ये असू शकतात, याबाबतीत काही शिफारशी व्यवस्थेकडून केलेल्या आहेत. सुचवलेल्या शिफारशींचा कंपन्या विचार करू शकतात किंवा तत्सम याशिवाय आणखी काही महत्त्वपूर्ण कार्य असतील, की जी समाजविकासासाठी करता येतील, त्यांचाही स्वीकार करण्याचे कंपन्यांना स्वातंत्र्य असते. कोणकोणत्या कार्यासाठी सीएसआर फंड वापरता येईल, ते क्षेत्र थोडक्यात पुढीलप्रमाणे – provide help to eradicating extreme hunger and poverty. Promotion of education. Promoting gender equality and empowering woman. Reducing child mortality and improving maternal health. Combating human immuno-deficiency virus, acquired immune deficiency, syndrome, malaria and other disease. Ensuring environmental sustainability. Employment enhancing vocational skills. Social business projects. Contribution to the Prime Minister's National Relief Fund or any other fund set up by the central government or the state government for socio-economic development and relief and funds for welfare of the scheduled castes, the scheduled tribes, other backward classes, minorities and woman. Such other matters as may be priscribed,[७] इत्यादी. काही ॲक्टिव्हिटी भारतीय कंपनी कायद्यानुसार 'सीएसआर'च्या अंतर्गत सुचवलेल्या आहेत. कॉर्पोरेट जगताने वरीलप्रमाणे सुचवलेले क्रियाच करावेत असे नाही, तर यासारख्या अनेक योजना ते राबवू शकतात, ज्याच्याने सामाजिक उत्तरदायित्वाचे

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

निर्वाहन करता येईल. वर उल्लेख केल्याप्रमाणे, एवढे स्वातंत्र्य उद्योगव्यापार विश्वाला देणे हे गरजेचे आहे.

आपण समाजाचे देणे लागतो, ही उत्तरदायित्वाची भावना आणि त्याची 'सीएसआर'च्या माध्यमातून परिपूर्ती करताना गरिबी, भूकबळी-निर्मूलन, शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, विशिष्ट सामाजिक घटकांचा विकास, शाळा महाविद्यालयांच्या इमारती उभ्या करणे, वसतिगृह उभारणे इत्यादींसारख्या समाजकल्याणकारी कार्यांत सहभाग घेऊन आपली सामाजिक नैतिक जबाबदारी पार पाडू शकतात. याचे अगदी अलीकडचे उदाहरण म्हणून, नागपूर विद्यापीठाच्या बाबतीत सांगायचे झाले, तर असे सांगता येईल की, बजाज उद्योगसमूहाकडून रातूम विद्यापीठास प्रशासकीय भवन उभारण्यास दिलेला 10 कोटींचा निधी हा त्यांच्या 'सीएसआर' धोरणाचाच एक भाग आहे. याशिवाय राज्य आणि देशभरात वेगवेगळ्या उद्योग-समूहांकडून उभारली गेलेले दवाखाने, धर्मशाळा, शाळा, महाविद्यालये इत्यादी हीसुद्धा सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग आहेत, हे या ठिकाणी सांगता येईल.

पर्यावरणाची समस्या ही आजघडीला अत्यंत ज्वलंत समस्या मानली जाते. या समस्येला बऱ्याच प्रमाणात औद्योगिक विश्वच जबाबदार आहे, असे मानले जाते. यात तथ्य आहे हेही नाकारता येणार नाही. यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांपासून मानवी जीवनाला वाचवायचे असेल, तर कंपन्यांचा सस्टेनेबल डेव्हलपमेंटवर अधिक भर असला पाहिजे. पर्यायवरणाला धोका निर्माण न करता कंपन्या कशा चालवता येतील, निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन यांसाठी कंपनीकडे असलेला फंड वापरून पर्यावरणाचे संतुलन कसे राखता येईल, याचा विचार कंपन्यांनी करणे समयोचित आहे.

साधारणत: PM care fund हा देशावर येणाऱ्या विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींच्या प्रसंगी वापरला जातो. भूकंप, पूर, अतिवृष्टी, त्सुनामी, वादळ, तुफान इत्यादींसारख्या नैसर्गिक आपत्तींनी अनेक लोक प्रभावित होत असतात. अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तींनी प्रभावित लोकांसाठी PM care fund वापरला जातो. हा निधी कंपन्यांच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातूनही जमा झालेला असतो. या माध्यमातूनही विविध औद्योगिक समूह आपआपले सामाजिक उत्तरदायित्व निभावू शकतात.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Science
NAGPUR

अशाप्रकारे अनेक कंपन्या, औद्योगिक समूह समाजाप्रति आपल्या कर्तव्याचे पालन करत असतात. देशाच्या आर्थिक विकासातही या कंपन्या अथवा औद्योगिक समूह मोलाचा वाटा उचलत असतात, हेही या ठिकाणी महत्त्वाचे आहे. देशातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, रोजगाराची साधने उपलबध करून देणे, इत्यादी महत्त्वपूर्ण कार्यांतून कंपन्या देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासांत हातभार लावत असतात.

'सीएसआर' धोरण राबवण्याचे कार्यक्षेत्र

देशाच्या एखाद्या राज्यात एखादा उद्योग स्थापन केला जातो. तो उद्योग उभारताना सर्वप्रथम जमीन अधिगृहीत करावी लागते. जमीन अधिगृहीत केल्यानंतर औद्योगिक क्षेत्राचे बांधकाम, कारखाना उभारणी, विशिष्ट प्रकारच्या यंत्रांची उभारणी, मनुष्यबळ निर्माण करणे, उद्योगासाठी लागणारी नोकरभरती करणे, कच्चा माल... इत्यादींसारख्या अनेक गोष्टींचे सखोल विचार-मंथन करून उद्योग उभारला जातो. जेव्हा उद्योग उभारला जातो, तेव्हा लागणाऱ्या मनुष्यबळाचा विचार करता, त्या उद्योगात कोणाला संधी द्यावी? कच्चा माल घेत असताना कोणास प्राधान्य द्यावे? इत्यादी प्रश्न महत्त्वाचे असतात. बाबतीत संबंधित उद्योगपती हा दुसऱ्या राज्यातील असेल आणि तो त्याच्या राज्यातून मनुष्यबळ आणत असेल, तर हे त्याच्या उद्योगाशी निगडित असलेल्या आचारसंहितेला अनुकूल आहे, असे म्हणता येणार नाही. ज्या भागात हा उद्योग उभारला गेला आहे, त्या भागातील लोकांनाच त्या ठिकाणी नोकरी देणे, हा त्या भागातील लोकांच्या नैसर्गिक अधिकाराचा भाग आहे आणि उद्योगपतीने तेथील स्थानिक लोकांना प्राधान्य देणे, हे त्याच्या कर्तव्याचा थोडक्यात सीएसआरचाच भाग आहे. हा एक नैसर्गिक न्यायाचा भाग आहे. त्याचप्रमाणे, कंपनी-कायद्यानुसारही औद्योगिक समूह अशाप्रकारच्या कृतीसाठी बांधील आहेत. The company give preference to the local area and areas around it where it operates, for spending the amount earmarked for corporate social responsibility activities.[८] स्थानिकांचा अधिकार हा नैसर्गिक अधिकार आहे. त्याचबरोबर, सीएसआर फंड याबाबतीतसुद्धा स्थानिक सामाजिक समस्या निर्मूलनावर खर्च करणे, हे कंपनीचे उत्तरदायित्व ठरते. कंपनीची ती नैतिक जबाबदारीसुद्धा असते.

या समर्थनाचा एक मुद्दा असा की, कोणत्याही कंपनीच्या नकारात्मक घटकांचे परिणाम त्या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांनाच सोसावे लागतात, याच न्यायाने कंपनीच्या बाबतीत सकारात्मक परिणामसुद्धा परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना मिळाले पाहिजेत, हीच नैतिकता आहे. त्यामुळे सीएसआर फंड उपयोगात आणण्याचे कार्यक्षेत्रही स्थानिक परिसर असणे, हेच न्याय्य ठरते.

निष्कर्ष

वरीलप्रमाणे सारासार विचार केला, तर असे लक्षात येते की, सद्य:स्थितीत 'सीएसआर' हा उद्योग, व्यापार क्षेत्राचा अविभाज्य असा भाग झालेला आहे. त्यामुळे औद्योगिक समूहांनी त्यांचा घटक असलेल्या व्यक्ती, समूह आणि त्या कंपनीक्षेत्रातील समाज यांच्या विकासासाठी अर्थातच शिक्षण, खेळ, संशोधनाच्या विकासासाठी, एकता, समताभाव रुजवण्यासाठी, भूकबळी, बेकारी इत्यादी समस्यांच्या निर्मूलनासाठी, बालसंगोपन, महिला विकास, दबलेल्या समाजघटकांच्या विकासासाठी 'सीएसआर'सारख्या उदात्त दृष्टिकोनाच्या माध्यमातून कार्य करणे अपेक्षित आहे. The Companies Act 2013, section 135नुसार 'सीएसआर'ला कायदेशीर करण्यात आलेले आहे. कायद्याचे बंधन या ठिकाणी घालून देण्यात आलेले आहे. कोणत्याही कृतीची नैतिकता बाह्य बंधनाबरोबरच आंतरिक, आत्मिक बंधनावर अधिक अवलंबून असते. प्रत्येक औद्योगिक समूहाने समाजाच्या उद्धारासाठी, विकासासाठी केवळ व्यवस्था सांगते, म्हणून कार्यरत असणे आणि स्वयंनियमाने कार्यरत असणे यात फरक आहे. सामाजिक जबाबदारी, कर्तव्यभाव यांचे निर्वाहन स्वयंनियमनाने केल्याने ते अधिक प्रभावी ठरू शकतात. त्यामुळे, सर्व औद्योगिक समूह हे, व्यवस्थानिर्मित नियमांबरोबरच जर स्वयंनियमनाने समाजाप्रति कार्यरत राहिले, तर कंपनी व समाज दोन्ही उत्तरोत्तर विकसित, समृद्ध होतील; यात काही शंका नाही.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, **राजेसाहेब मारडकर**
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर व तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
mail ID: rajesahebmaradkar@gmail.com

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

संदर्भ

१ Sharma C (2003), A Critical Servey of Indian Philosophy, MB Publisher, Delhi, p. 13
२ पाठक, दि (१९९४), भारतीय नीतिशास्त्र, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पाटना, पृ. २-३
३ अकोलकर, ग. वि (१९९०), शैक्षणिक तत्त्वज्ञानाची रूपरेषा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ. १४८
४ महाराष्ट्र टाईम्स, २४ ऑगस्ट, २०१९, MCCIA अध्यक्षांचे मत
५ The Companies Act 2013, p. 87 -retrieved from https://mca.gov.in/content/mca/global/en/home.html on 27 may 2021
६ तत्रैव, पृ. ८७
७ तत्रैव, पृ. २८८
८ तत्रैव, पृ. ८७

विचारशलाका

संपादक : प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३८ वे, एप्रिल २०२३ ते मार्च २०२४
संयुक्त अंक १४६, १४७, १४८ व १४९ वा

ISSN 2229-7901
UGC CARE Listed



चार्वाक तत्त्वज्ञान विशेषांक

१२. चार्वाकांचा प्रमाणविचार : एक चिकित्सक अभ्यास
डॉ. मीनल कातरणीकर / १८३
१३. चार्वाकवादी तत्त्वचिंतनाची मीमांसा : एक तार्किक मांडणी
डॉ. राजेसाहेब मारडकर / १९७
१४. लोकायतिकांचा नीतिधर्म आणि प्रमाण विचार
प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे / २०५
१५. लोकायत आणि राज्यशास्त्र
प्रा. डॉ. अशोक चौसाळकर / २२७
१६. मराठीतील लोकायत विचार : एक आढावा
प्रा. डॉ. प्रदीप गोखले / २३७
१७. चार्वाक दर्शनाचे योगदान
प्रा. डॉ. साहेबराव निगळ / २६०
१८. अष्टदर्शनातील 'चार्वाकदर्शन'
डॉ. पी. विठ्ठल / २६५
१९. भगवद्गीतेमधील चार्वाक
डॉ. अशोक राणा / २७५
२०. चार्वाक, टिळक व आगरकर
डॉ. शर्मिला वीरकर / ३१४
२१. चार्वाक दर्शनातील मुक्तीची संकल्पना
डॉ. मुबीन शेख / ३२७
२२. चार्वाकांचे तत्त्वज्ञान एक अभ्यास
डॉ. उद्धव नरहरी कांबळे / ३३१
२३. लोकायत आणि लिंगायत : समान संहिता
डॉ. राजशेखर सोलापुरे / ३३७
२४. चार्वाकांचे नीतिशास्त्र आणि आधुनिक जग
डॉ. सुनील ब. भोईटे / ३४५
२५. चार्वाक दर्शनाची प्रासंगिकता
डॉ. युवराज श्रीराम मानकर / ३६०

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

२२

चार्वाकांचे तत्त्वज्ञान एक अभ्यास

■

डॉ. उद्धव नरहरी कांबळे

प्रस्तावना

भारतीय दर्शनातील नास्तिकवादी विचारसरणीचा प्रमुख विचारस्रोत म्हणून चार्वाक यांच्याकडे पाहिले जाते. चार्वाकांनी वेदाचे प्रामाण्य नाकारून वास्तववादी विचारसरणीची मांडणी केलेली आहे म्हणून त्यांना नास्तिकवादी विचारसरणीचा जनक म्हणून संबोधले जाते. चार्वाक आत्मा, पुनर्जन्म, पाप-पुण्य, मोक्ष, कर्मकांड, अंधश्रद्धा, स्वर्ग-नरक या सर्व गोष्टी तार्किकतेवर, वैज्ञानिक तेवर आणि वास्तवावर आधारित नाहीत हे सांगून त्याची त्याची चिकीत्सक मिमांसा करुन वास्तव काय आहे हे सर्वांसमोर मांडतात. तसेच ते सामाजिक अन्यायाचा निषेध करतात. समाजातील स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात. वरील सर्व विचार विस्तृतपणे सदरील शोध निबंधामध्ये सविस्तरपणे मांडला जाणार आहे.

प्रमाण विचार

चार्वाकांचे प्रमाण विवेचन, तर्कशास्त्र अगदी वेगळे आहे. त्यांना कोणताही धर्मग्रंथ; आप्तवाक्य मान्य नाही. ते जेव्हा म्हणतात शब्द प्रामाण्य नाही तेव्हा ते आपल्या भूमिकेशी अत्यंत प्रामाणिक आहेत. एखादी श्रुती मान्य नाही, एखादी स्मृती मान्य नाही, तसेच एखादा तिर्थंकरही मान्य नाही की एखादा तथागतही मान्य नाही. इतरांशी वाद करताना ते बृहस्पतीला नमस्कार करुन सुरुवात करत नाहीत. तेव्हा शब्द प्रमाण गेलेच.[१]

चार्वाकांच्या मते, 'प्रत्यक्षमेव प्रमाणम' म्हणजे इंद्रियांना होईल ते सत्यज्ञान. स्पर्शाने मऊ लागेल तेच मऊ. ऐकू आलेला आवाज कर्कश असेल तर तो कर्कश. जिभेला एखादा पदार्थ आंबट लागला तर आंबटच अशा स्पष्ट स्वरुपाचे इंद्रियजन्य

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ज्ञान असते. असेच प्रत्यक्ष ज्ञानच प्रमाण म्हणावे असे चार्वाक म्हणतात. चार्वाकांची प्रत्यक्षाची ही भूमिका त्यांच्या सर्व विचारात सामावलेली आहे. त्यांनी वेद प्रमाण नाकारले ते याचमुळे.[१]

चार्वाकांची वेदटीका

चार्वाकांच्या वेद टीकेचे स्वरुपच वेगळे आहे. त्यांनी वेद मानले नाहीत म्हणजे शब्द प्रमाण मानले नाही. स्वत:च्या भूमिकेशी ते अत्यंत प्रामाणिक होते. परस्पर विरोधी, विसंगत असे ते कधीच बोलत नाहीत. वेद अपौरुषेय, नित्य असे मानायला ते तयार नाहीत. वेद कर्तृत्व मानवी स्मृतीच्या पलीकडचे आहे. म्हणून वेदाचे श्रेष्ठत्व मानणे त्यांना हास्यास्पद वाटते. एखाद्या विहिरीचे पाणी किंवा धर्मशाळेचे मूळ सांगता येत नाहीत. प्रदेश उद्ध्वस्त झाला, खूप काळ लोटला तर कर्त्याचे नाव लोपले जाते. पण म्हणून कृती नित्य किंवा अपौरुषेय होते की काय ? चार्वाक पुढे असे म्हणतात की वेद मानवांनी निर्मिले एवढ्यासाठीच केवळ आम्ही त्यांना अप्रमाण म्हणणारच नाही. परंतु माणसाच्या ठिकाणी दोष असतात आणि ते त्यांच्या कृतीत उतरतात म्हणून वेद निर्दोष, बिनचूक प्रमाण असणे शक्य नाही. शिवाय असे की तुम्ही वेदांचे शब्द मानता, पण त्या शब्दाच्या अर्थाविषयी तुमची खात्री आहे का ? कर्त्याने ज्या अर्थी शब्द वापरले असतील त्याच अर्थाने ते निश्चितपणे तुम्ही घेता का ?[२]

वेदातील काही भागाची अर्थ शून्यता चार्वाकांनी दाखवून दिली. जर्भरी, तुर्फरी इ. शब्द प्रयोगाचे स्पष्टीकरण करा असे आव्हान त्यांनी ब्राह्मणांना दिले. मासाची चटक लागल्यामुळे यज्ञ आणि तत्प्रीत्यर्थ पशुहत्या हा प्रकार होता असे सांगून त्यांनी ब्राह्मणांचे जिव्हालोल्य जाहीर केले. यज्ञात टाकलेली आहुती स्वर्गाला जाते. तर यजमानाने आपल्या तीर्थ रूपांना अशा तऱ्हेने स्वर्गात का पाठवू नये ? श्राद्धांत दिलेले अन्न परलोकीच्या पितरांना पोहोचते तर प्रवासाला बाहेर पडलेल्या माणसाला शिदोरी कशाला बांधून द्यायची ? घरीच श्राद्ध का करू नये ? असले मिश्किल प्रश्न उपस्थित करून वेदोक्त कर्मकांड कल्पनांवर उभे आहे हे त्यांनी दाखवून दिले आणि एकंदर असा आढावा घेऊन वेद चुकीचे असून ती भिक्षुकांची निर्मिती आहे असा निर्णय त्यांनी दिला.[४]

ईश्वरकल्पनेची मीमांसा

चार्वाकांनी वेदाप्रमाणे ईश्वरास महत्त्व द्यावे की देऊ नये हे सांगितले आहे. चार्वाकांनी प्रत्यक्ष निष्ठतेच्या आधारावर ईश्वर कल्पनेची चिकित्सा केलेली आहे.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt.
of Arts and Soci[illegible]
NAG[illegible]

त्यांच्या मते, ईश्वर मानणारे आदी धर्म आणि अधर्म मानतात. त्या धर्मानुसार माणसाला स्वर्ग आणि नरक असे फळेही मानतात आणि मग ही फळे देण्याचे काम पाहणारा एक व्यवस्थापकही येतो तो ईश्वर. यावर चार्वाक विचारतात धर्म आणि अधर्म तुम्ही कोठून आणले ? अशाच्या आश्रयाने ठरविले ? ह्याला उत्तर नाही असेच आहे. हे धर्म आणि अधर्म जेवढे काल्पनिक तेवढेच स्वर्ग आणि नरक आणि ते देणारा ईश्वर म्हणजे निव्वळ कल्पनाच. ही सगळी खटपट तुम्हाला का करावी लागते. तर मानवी सुखदुःखाची कारणे तुम्ही इहलोकाकडून अन्य कोठे तरी शोधू लागला म्हणून. सुख दुःख इथेच इहलोकीच वेगवेगळ्या कारणांनी उत्पन्न होऊन मानवी जीवनात काही दुःख असणे, तसेच कुणी सुखी असणे, कुणी दुःखी होणे असे प्रकार घडतात. तेव्हा सुखदुःखाचे स्पष्टीकरण ईश्वर कल्पनेच्या आधाराने करण्याचे काही कारण नाही.[५] त्याचप्रमाणे सृष्टीचा निर्माता म्हणून ईश्वर मानण्याचे काहीच कारण नाही. ईश्वराने अग्नी उष्ण केला, पाणी शीतल केले, कोकिळेला मधुर आवाज दिला, मोराला रंगीत पिसारा दिला वगैरे सर्व निराधार आहे.[६] कारण या सर्व गोष्टी त्याच्या स्वभावामुळे घडतात असे चार्वाक म्हणतात.

जीवशास्त्र विषयक विचार

चार्वाक असे म्हणतात की पृथ्वी, आप, तेज, वायू अशा भूतांचा संयोग झाला की, जीव निर्माण होतो. मद्यार्क ज्यापासून तयार केला जातो त्या मूलद्रव्यात मदशक्ती नसणे. पण मूलद्रव्याच्या रासायनिक मिश्रणाने जो एक मदिरा नावाचा पदार्थ तयार होतो, त्यात काही वेगळेच गुण दिसतात. पान, कात, चुना यापासून जो लाल विडा होतो तो निराळाच, तसेच पृथ्वी, जल वायू ह्यात पण ह्यांच्या विशिष्ट संयोगाने जो जीव तयार होतो त्यात चैतन्य असते.[७] ह्या चैतन्य विशिष्ट देहापलीकडचा कोणी आत्मा मानायला चार्वाक तयार नाहीत. मी तरुण आहे, मी पुरुष आहे, स्त्री आहे अशा जाणिवेसकटचा माझा जो देह तोच आत्मा.[८] ह्या देहापेक्षा वेगळा आत्मा अनुभवजन्य ज्ञानात बसत नाही. चैतन्य विशिष्ट देहाच्या संदर्भात बृहदाअरण्य मध्येही उल्लेख आढळतो.

"विज्ञानध एवैतेभ्यो भूतेभ्यः
समुत्थाय तान्येबानु विनश्यतिन
प्रेत्य संज्ञास्तिती"[९]

(बृहदाअरण्य अध्याय २)

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

अर्थात आत्माच या शरीरींद्रिय संघातावर परिणाम झालेल्या भूतापासून उत्पन्न होऊन त्याचा नाश होताच त्याच्या मागोमाग नाश पावतो. मरणानंतर त्याचे काही भान होत नाही, त्या चैतन्याचा अनुभव येत नाही. यास्तव चैतन्य विशिष्ट देहच आत्मा आहे. ते आत्मा स्वीकार करत नाहीत याचाच अर्थ ते पुनर्जन्म नाकारतात.

मोक्ष विचार

मानवी जीवन नेहमी धडपडत असते. काहीतरी शोधीत असते. त्याला काय हवे असते ? हे जे हवे याला तत्त्वज्ञ अनेक नावे देतात. कुणी सुख म्हणतात, कुणी समाधान म्हणतात, कुणी शांती म्हणतात, कुणी चिरशांती म्हणतात. तत्त्वज्ञ ह्या धडपडीला योग्य नाव शोधून थांबायला तयार नसतात. भारतीय तत्त्वज्ञानांनी ही मानवी जीवनाचा आणि जीवन ध्येयाचा विचार केला, कसून चिकित्सा केली आणि त्यांना धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ दिसले. सर्व वैदिक, बौद्ध आणि जैन विचारवंतांना, दार्शनिकांना आणि लेखकांना सुद्धा मोक्ष हा परम पुरुषार्थ वाटतो. हे जे परमोच्च ध्येय मोक्ष एक अवस्था आहे. ही अवस्था म्हणजे शरीराची, मनाची की आत्म्याची ? त्या अवस्थेच्या स्वरूपाविषयी अनेक मते आहेत. नैयायिक, वैशेषिक, सांख्य वगैरे म्हणतील की दुःखाचा अंत म्हणजे मोक्ष, तर मीमांसक, वेदांती, जैन वगैरेना त्यात सुख सिद्धी ही दिसेल.[१०] या मोक्ष कल्पनेवर चार्वाकपंथीय असे म्हणतात की, जो विचार करावयाचा तो केवळ ह्या जन्मापुरताच. ह्या जन्मासंबंधी बोलताना कोणी म्हणतात की सर्वच दुःखच दुःख, काम हे दुःख, धन हे दुःखच. हे सर्व बंधन. गुरूच्या ठिकाणी, वेदाच्या ठिकाणी निश्चयात्मक श्रध्दबुद्धी हीच मुक्ती (सुख नव्हे), तर काही म्हणतील की जीवनात सुखे दुःखे दोन्ही दिसत असली तरी माणसाला दुःखाचा क्लेश जेवढ्या तीव्रतेने जाणवतो, तेवढ्या उत्कटतेने सुखाचा अनुभव घेता येत नाही. क्वचित कोठे तरी, कोणी तरी सुखी दिसतो. पण एकूण दुःखाचे प्रमाण जास्त आहे.[११] सर्व दुःख हे बौद्धांचे पहिले आर्यसत्य. जैनांचाही तोच विचार आहे. याबर चार्वाक म्हणतात हा विचार बरोबर नाही. जीवन केवळ दुःखी नाही. ते सुखदुःख मिश्रित आहे. जीवनात दुःखे भोगावी लागतात. ते नाकारून चालणार नाही. पण दुःखे टाळता येतात, कमी करता येतात. दुःखाची कारणे नाहीशी करून ह्या जीवनातच, इथून निवृत्त न होता माणसाला सुखी होता येईल. सुखाचा उत्कटतेने अनुभव घेता येईल, तुम्ही ज्याला स्वर्ग म्हणता तो इथे निर्माण करता येईल, असा सिद्धांत चार्वाक मांडतात. सगळे दुःख आहे असे समजून सुखाचा त्याग करण्याचा सल्ला मूर्खपणाच ठरेल असा चार्वाक स्पष्ट

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

करतात. दुःखे कमी करून सुख कसे मिळवावयाचे ही माणसाच्या कौशल्यातली, शहाणपणाची आणि विवेकशीतलेची बाब आहे. हा मुद्दा ते उदाहरणाने स्पष्ट करतात. काटा काढून मासा खावा, साळीवरचा तूस काढून आतला तांदुळ खायचा असतो, तुसाचे आवरण आहे म्हणून तांदूळ त्याज्य, काटा म्हणून मासाच वाईट हा निव्वळ अडाणीपणा नव्हे काय ?[१२] मनुष्याने शेवटी ज्याने सुखप्राप्ती होईल अशाच गोष्टी आयुष्यात कराव्या हाच मोक्ष आहे.

स्वातंत्र्य हाच मोक्ष

जी मोक्षाची कल्पना इतर तत्त्वचिंतकांना अभिप्रेत होती तिचा चार्वाकांनी कधीच स्वीकार केला नाही. परंतु मोक्ष ह्या संस्कृत भाषेतील शब्दाचा उपयोग करायला चार्वाकांना हरकत नव्हती. मोठ्यात मोठे इप्सित असे काही तरी जीवनात असते, हे चार्वाक मान्य करतात. पण ते उच्चतम ध्येय पुनर्जन्मापासून मुक्ती वगैरे हे त्यांना मान्य नाही. त्याच्या मते, स्वातंत्र्य हाच मोक्ष आणि पारतंत्र्य हेच बंधन.[१३] कुठल्याही प्रकारची परतंत्रता हे बंधन आणि माणसाला आपल्या इच्छा-आकांक्षांच्या अनुरोधाने आपल्या मतानुसार जगण्याची परिस्थिती हे स्वातंत्र्य, ही अत्युच्च सुखावस्था, हाच परमानंद, हे उच्चतम ध्येय, हाच मोक्ष. मोक्षाचा ऐहिक जीवनाशी आणि केवळ ऐहिक जीवनाशीच संबंधित असा अर्थ चार्वाकांनी दिला आहे.

स्त्री विषयक विचार

चार्वाकांच्या कालखंडात स्त्री वर्गावर ब्राह्मण वर्ग, पुरोहित, भिक्षुक, राजे राजवाडे यांच्याकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारावर ते टीका करत असायचे. ते असे म्हणतात की स्त्री ही सुद्धा एक माणूस आहे. तिला आपण माणूसपणे वागवले पाहिजे. ती जड वस्तू नाही. म्हणून तिला मिळकत समजता येणार नाही. ती पुरुषाची जीवनसखी असते. ती विधायक वृत्तीची असते. ती सुसंवाद, मेळ, सामंजस्य, प्रेम आणि शनी याची मूर्ती असते. तिला स्वैराचारी, भोगवस्तू म्हणून हिणवणे चूक आहे. ब्राह्मण वर्ग, पुरोहित, भिक्षुक, राजे राजवाडे हे स्त्रियांची बदनामी करून त्यांची अवहेलना करतात. स्त्रियांना असे वागविणे हे मानवजातीला काळिमा फासणारे आहे.[१४]

एकंदरीत भारतीय तत्त्वज्ञानातील चार्वाकांचे हे विचार जगातील प्रत्येक व्यक्तीला जीवनाकडे वास्तवानुसार पाहून, विचार करून जीवन जगण्यास साहाभूत ठरणारे आहेत. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, आत्मा, पुनर्जन्म, ईश्वर अशा घटकांना चार्वाक विरोध करून त्या संदर्भात वास्तव कोणते आहे हे आपल्यासमोर मांडतात. यातून चार्वाक

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ज्या घटकांना नाकरतात त्या सर्व चुकीच्या गोष्टीस तुम्ही आम्ही सर्वांनी बळी पडण्यास काही कारण नाही. जीवनात केवळ वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा हीच अपेक्षा चार्वाकांची आहे हे वरील विवेचनावरून सिद्ध होत आहे.

संदर्भसूची :

१. सदाशिव आठवले, 'चार्वाक इतिहास आणि तत्त्वज्ञान', प्राज्ञ पाठशाळा मंडळ, पुणे, १९९७, पृ.क्र. ३३-३४.
२. तत्रैव पृ.क्र. ३४.
३. तत्रैव पृ.क्र. ४८.
४. तत्रैव पृ.क्र. ४९.
५. तत्रैव पृ.क्र. ५३.
६. तत्रैव पृ.क्र. ५४.
७. तत्रैव पृ.क्र. ५५.
८. तत्रैव पृ.क्र. ५५.
९. डॉ. सरिता जांभुळे, 'चार्वाक जीवनदृष्टी', सुगावा प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०१४. पृ.क्र.
१०. सदाशिव आठवले, उनि, पृ.क्र. ५९-६०.
११. सदाशिव आठवले, उनि, पृ.क्र. ६०-६१.
१२. सदाशिव आठवले, उनि, पृ.क्र. ६१-६२.
१३. सदाशिव आठवले, उनि, पृ.क्र. ६६-६३.
१४. डॉ. गजानन जोशी, 'वेद, उपनिषदे व भौतिकवाद', शुभदा-सारस्वत प्रकाशन, पुणे. पृ.क्र. २०४.
१५. डॉ. श्रीनिवास दीक्षित, 'भारतीय तत्त्वज्ञान', फडके प्रकाशन, कोल्हापूर. ऑक्टोबर. २०१५.

डॉ. उद्धव नरहरी कांबळे
सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाज विज्ञान संस्था, नागपूर
मो. - ९३५६०८६३८८

□□□

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Science
NAGPUR

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक।।

पुरवणी अंक ३ – मार्च २०२३ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : ३

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- प्राचार्य डॉ.सुनिल हेळकर
- प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड
- प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

*** प्रकाशक ***

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

२४. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
- प्रा.डॉ. जवाहर मोरे ---------- ९७

२५. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता
- डॉ. अंकुश तुकाराम करपे ---------- १००

२६. शैक्षणिक व सामाजिक सुधारणांचे प्रणेते : छत्रपती राजर्षी शाहू महाराज
- प्रा. संपतराव माणिकराव गर्जे ---------- १०५

२७. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा समाजसुधारणेच्या संदर्भातील तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोण
- डॉ. उध्दव न. कांबळे ---------- ११०

२८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि समाजसुधारणा
- डॉ. उध्दव न. कांबळे ---------- ११४

२९. राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान
- डॉ. राजेंद्र नामदेव रासकर ---------- ११८

३०. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास
- डॉ. रेश्मा अणवेकर ---------- १२१

३१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक विचार आणि कार्य
- डॉ. गणेश एन. बहादे ---------- १२६

३२. सर्वंकष सुधारणांचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज
- किशोर जनार्दन लांडेपाटील ---------- १३०

३३. छत्रपती शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे आधारस्तंभ
- डॉ. विकास विलासराव शिंदे ---------- १३५

३४. राजर्षी शाहू महाराज यांची समतावादी दृष्टी व समकालीन प्रस्तुत
- प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ ---------- १३९

३५. मानवतावादी व्यक्तिमत्व – राजश्री शाहू महाराज
- प्रा. डॉ. आनंदा एम. काळबांडे ---------- १४४

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि समाजसुधारणा

डॉ. उध्दव न. कांबळे
सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
ई-मेल : unkamble27@gmail.com
मोबाईल - ८३५६०८६३८८

सारांश :

हात्मा फुले यांनी प्रथम महाराष्ट्रामध्ये समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. समाजातला बहुजन म्हणून गणला जाणारा वर्ग सर्व हक्क, अधिकारापासून वंचित असताना शिक्षणाची गंगा सर्व घटकांपर्यंत पोहचवून, समाजसुधारणेचे कार्य केले. फुलेंच्या नंतर शाहू महाराजांनी त्यांचे कार्य पुढे चालू ठेवले. महाराज असे म्हणत असत की, समाजाच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीकोनातून शिक्षण हे महत्त्वपूर्ण आहे. त्याचा लाभ सर्वांना सर्वांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यासाठी शाहू महाराजांनी कोल्हापूर आणि कोल्हापूरच्या बाहेर शिक्षणाची गंगा दारोदारी पोहचवली. परिणामत: समाज सुधारीत झाला.

सूचक शब्द : शिक्षण, समाजसुधारणा, शाहू महाराज, उच्चशिक्षण, जातीभेद.

प्रस्तावना :

'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' या उक्तीप्रमाणे राजश्री शाहू महाराज एक क्रियाशील सुधारक तत्त्वज्ञ होते. ते एक प्रगतीप्रिय राजे असल्यामुळे त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील सर्व जाती धर्माची प्रगती साधावयाची होती. शिक्षण ही विकासाची गुरूकिल्ली आहे, हे शाहू महाराज चांगले ओळखून होते. त्यांना लोकांच्या उत्कर्षासाठी, बुद्धीच्या प्रगतीसाठी, मनावरील संस्कारासाठी गावोगावी शिक्षणाचे लोण त्यांना पोहोचवयाचे होते. आदर्श राज्यकर्त्यांचे खरे कर्तव्य शिक्षण आणि उद्योग यांची वाढ करून जनहित साधने असते. समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहणे हे खऱ्या राज्याचे कर्तव्य असते. शाहू महाराजांनी सर्वांच्या शिक्षणाची सोय करून त्यांना स्वत:च्या हक्काची जाणीव करून देण्याची युगान्तर कार्य केले. महाराजांच्या समाजातील सर्व जाती-धर्माच्या शिक्षणाची ही काळजीवाहू कृती म्हणजे युगप्रवर्तक धैर्याची आणि कृती शूरपणाची प्रकाशमान पताकाच होय. महात्मा फुलेंनी जी ज्ञानज्योत लावली त्या 'ज्योतीने ज्योत लावण्याचे काम राजर्षींनी केले. हे काय करत असताना आपल्या समता आणि मानवता या दोन नेत्रासमोर,

'धर्म राज्ये भेद नसावे । सत्याने वागावे । ईशासाठी ।।
ख्रिस्त, महंमद ब्राह्मणांसी । धरावे पोटाशी । बंधूपरी ।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक कशासाठी ?'

ही महात्मा फुलेंची तत्त्वनिष्ठा डोळ्यासमोर ठेवून आणि स्वामी दयानंदांचा सर्व मानवजातीच्या उन्नतीचा मूलमंत्र मनात बाळगून राजश्रींनी लोकशिक्षणाचा यज्ञ केला.

शिक्षण :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाच्या संदर्भात एके ठिकाणी असे म्हणतात, 'विद्येशिवाय माणसाला शांतता नाही आणि माणूसकीही नाही. ती महासागरासारखी आहे. माणसाला जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता तशीच विद्येची.' त्यांच्या मते शिक्षणामुळे जगणे सुसह्य होते. जगण्यासाठी शक्ती मिळते. वैचारिक दृष्टी प्राप्त होते. जीवनातील आव्हानांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. स्वावलंबी, स्वाभिमानी बनता येते. व्यक्तीमध्ये नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य व चांगले-वाईट यांमध्ये फरक करण्याची विवेकशक्ती विकसित होते. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षणामध्ये व्यक्तीला विषमता, शोषण, अज्ञान, दारिद्र्य व गुलामगिरी यांतून मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे. शिक्षण हा समाज व राष्ट्र यांच्या विकासाचा पाया आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला शिक्षणविषयक विचार महाराजांच्या विचारांशी सुसंगत असा विचार आहे. समाजसुधारणेच्या संदर्भात शिक्षणविषयक हाच विचार महाराज स्वीकारतात आणि त्या संदर्भातील निर्णय कोल्हापूर प्रांतात आणि प्रांताच्या बाहेर लागू करतात. महाराजांचा शिक्षण विचार पाहण्यापूर्वी त्यांच्या कार्यकाळात असणारी शैक्षणिक परिस्थिती पाहणे गरजेचे आहे.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ISSN No. 2394-5990

शाहू महाराज पूर्व काळातील शैक्षणिक परिस्थिती :

त्या काळातील तथाकथित वर्णवर्चस्ववादी अत्यंत अहंकारी होते. अहंकाराच्या धुंदीमुळे त्यांच्या सद्‌सद् विवेकबुद्धीचे बंध तुटले होते. अविवेकाच्या आंधळेपणामुळे समरस विचारांचे बांध फुटले होते. 'शिक्षणाच्या किल्ल्या आमच्या कमरेला आहेत. या अविचाराने ते ग्रासलेले होते. यामुळे शुद्राचे जीवन दु:खीकष्टी झाले होते. सावकारी पाशानी त्यांचे गळे आवळलेले होते. अंधश्रद्धेमुळे त्यांची विचारशक्ती नष्ट झाली होती. अज्ञानामुळे त्यांची अस्मिता लोप पावली होती. धर्ममार्तंडांनी त्यांना दैववादी बनवले होते. खरे तर ही वेळ समस्त शूद्रांच्या मस्तकावर ज्ञानाचा अभिषेक करण्याची गरज होती. याच वेळी शिक्षणाच्या किल्या सर्वसामान्य अज्ञानी बांधवाच्या हातात देण्याची आवश्यकता होती. अंधश्रद्धेमुळे आलेले दैन्य-दारिद्र्य झुगारून ज्ञानाच्या फुलवातीने त्यांचे सारे जीवन उजळून टाकण्याची सुसंधी आलेली होती. याच सुसंधीचा उपयोग महाराजांनी केलेला होता. समाजातल्या प्रत्येक घटकाचा सर्वांगिण विकास घडवून यावा ही त्यांची प्रांजळ आणि व्यापक भूमिका होती. त्याकरिता त्यांनी शिक्षणास जीवनाचे अंतिम ध्येय मानले होते.'

शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

१. प्राथमिक शिक्षण :

विसाव्या शतकाच्या प्रथम दशकात महात्मा फुले नंतर प्राथमिक शिक्षण विचारांचे सूत्र महाराजांनी पकडले. कोल्हापूर हे सत्यशोधक समाजाचे एक शक्तिशाली केंद्र करून महाराष्ट्रभर ही शिक्षणलाट उसळून देण्याचे काम महाराजांनी केले. त्यांनी पायाभूत शिक्षण म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या कार्यास प्रारंभ केला. रयतेतील प्रत्येक माणसाला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा महाराजांचा दंडक होता. कारण सर्व लोक शिक्षण संपन्न झाले तरच शिक्षणप्राप्त लोकांची मक्तेदारी नष्ट होईल. प्रथम महाराजांनी खेडेगाव घटक मानून शिक्षण प्रसारास प्रारंभ केला. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार प्रभावीपणे व्हावा यासाठी २४ जुलै १९१७ रोजी हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

प्राथमिक शिक्षणासाठी शाळांची निर्मिती, धर्मशाळेचे बांधकाम, त्यावरील देखरेख, उत्पन्न खर्च, शिक्षकांच्या नेमणुका, शिक्षकाची पात्रता, शिक्षकाचे प्रशिक्षण, शिक्षकाचे वेतन, शाळाची तपासणी, ग्रंथालय, एकूण शिक्षण पद्धती इ. सर्व घटकांना महत्त्व देणे आवश्यक आहे, असे महाराज म्हणतात. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे या योजनेची पहिली कार्यवाही ४ मार्च १९१८ साली झाली. त्याप्रमाणे मुक्काम चिखली, पेटा, करवीर, येथे पहिली प्राथमिक शाळा काढण्यात आली. या योजनेसाठी त्याकाळात महाराजांनी सुमारे पाऊणलाख रुपये खर्च केले. त्यामुळे सुमारे ४६३० मुले शाळेत शिकत होती. नंतर सन १९२२ साली या योजनेसाठी सुमारे तीन लाख खर्च करण्यात आले. त्या काळात महाराजांनी प्राथमिक शिक्षणावर केलेला खर्च पाहता त्यांच्याकडे शिक्षणाविषयीची लालसा कळवळा किती होता हे उघड होते. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा शुभारंभ झाल्यानंतर प्राथमिक शाळाची संख्या चंद्रकलेप्रमाणे वाढत गेली. या योजनेची वाढ पुढीलप्रमाणे झाली.

वर्ष	शाळा	विद्यार्थी
१९१७-१८	२७	१,२९६
१९१८-१९	९५	४,६२१
१९१९-२९	१७०	६,३६२
१९२०-२१	३७६	१७,२१८
१९२१-२२	४२०	२२,००७

बारा बलुतेदाराच्या, मांगा-महारांच्या मुलांसाठी वेगळ्या प्राथमिक शाळा न काढता सर्व मुलांना एकत्रच बसवावे आणि शिक्षण द्यावे असा महाराजांनी जाहीरनामा काढला होता. म्हणून प्राथमिक शिक्षण म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील जातिनिर्मुलनाची केंद्रेच बनली. शिक्षणप्रसार आणि जाति-निर्मुलन या दोन्ही गोष्टी महाराजांनी एका दमात करून टाकल्या.

२. उच्च शिक्षण :

सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या बाबतीत शाहू महारांचे नाव अग्रक्रमाने घ्यावेच लागते. शिक्षणाच्या इमारतीचा पाया मजबूत व्हावा म्हणून महाराजांनी प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. पण त्यांनी उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष केले असे म्हटले जाऊ शकत नाही. महाराजांनी समाजातील बहुसंख्य अज्ञानी समाजास ज्ञानाच्या उजेडात आणण्याच्या हेतूने प्राथमिक शिक्षणापासून सुरुवात केली. ह्यामुळे समाज साक्षर होईल, पण ज्ञानी होईल, पण ज्ञानीपणा म्हणजे ङ्गशहाणपणाफ नव्हे. ज्ञानीपणामध्ये जीवनाच्या मूलभूत ऊर्जा, उर्मीचा वेध घेण्याची शक्ती असते. पण शहाणपणा हा ज्ञानीपणाच्या हाताला धरून चालत असतो. त्यांना ज्ञानाच्या सहाय्याने सारा समाज सतेज आणि डोळस करून सोडायचा होता. त्यासाठी त्यांनी उच्च शिक्षणाचे रणशिंग फुंकले.

शाहू महाराज महाराष्ट्रभर शिक्षणप्रसाराचे काम सातत्याने करत होते. अनेक गोर-गरीब, होतकरु, गरीब विद्यार्थ्यांना

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

परदेशी उच्च शिक्षण घेण्यासाठी खाजगीतून मदत केली. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, श्री शिवाजी मराठा सोसायटी स्थापनेमागील सक्रियता, प्रेरणा महाराजांचीच होती. कोल्हापूरच्या बाहेरही महाराजांनी पुण्यासारख्या ठिकाणी उच्च शिक्षणास उत्तेजन, सहानुभूती आणि पाठबळ दिले. अनुसुचित जातीजमातीसाठी शिक्षण संस्थामधून आणि नोकऱ्यांमधून विशिष्ट प्रमाणे राखून ठेवून मागासलेल्या वर्गास पुढे आणण्याचेही कार्य केले. ते एक सामाजिक कर्तव्य आहे. ती मेहेरबानी नही, अशी महाराजांची भूमिका होती.

'लोकशिक्षण हा लोकशाहीचा पाया आहे.' हे तत्त्व राजर्षींनी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत पाळले होते. म्हणजे प्रत्येक जातीने आपल्यातील स्त्री-पुरुषांना चांगले शिक्षण दिले पाहिजे. त्यावर महाराजांचा कटाक्ष होता. कारण शिक्षणामुळेच जातीभेद नष्ट होऊन समाज एका ठिकाणी आनंदाने नांदेल, असा महाराजांना विश्वास होता.

महाराजाच्या शैक्षणिक तालमीत तयार झालेल्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब खर्डेकर, कर्मवीर घोगटे, बाबूराव जगताप आदिचा उल्लेख करता येईल. विशेषत: कर्मवीर भाऊरावांनी निर्माण केलेली 'रयत शिक्षण संस्था' म्हणजे जोतीरावांच्या शिक्षण परंपरेचा दिप्तीसंपन्न थोर वारसा घेऊन आणि शाहू महाराजांच्या हृदयातील शिक्षण प्रसाराचे स्वप्न मनी बाळगून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात पसरलेल्या रयतेच्या जीवनाचा सर्व बाजूंनी विचार करून उत्तम नागरिक करणारी एक 'ज्ञानगंगा'च होय. याच पद्धतीने महाराजांनी सुरू केलेली प्राथमिक, उच्च शिक्षणाची सरिता पुढे जाऊन 'शिक्षण सागर' बनली.

३. स्त्री शिक्षण :

बहुजन जमाजाप्रमाणे स्त्री जीवनाच्या मागासलेपणाची महाराजांना जाणीव होती. स्त्री शिकली पाहिजे, तिचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. स्त्री शिकली तर सर्व कुटुंबाचा विकास होतो अशी व्यापक भावना महाराजांची होती. कोल्हापूर स्थित राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत महाराजांनी जाहीर केलेली होती. आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधव्य प्राप्त झाल्यावर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानचे शिक्षण खाते त्याच्याकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता. तथापि राणीसाहेबाच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही. संस्थानच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस लिटन नंतर त्यांनी श्रीमंती रखमाबाई केळकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोण स्पष्ट होतो.

४. पुरोहितशाळा :

शाहू महाराजांच्या कालखंडात पुरोहितगिरी सामाजिक प्रगतीला विरोध करून बहुजन समाजाच्या अज्ञानावर ती आरूढ झालेली आहे हे राजर्षींना पक्के माहित होते. म्हणून जन्माधिष्ठित पुरोहित गिरीला सुरूंग लावून वैदिक धर्माचे दरवाजे सर्वांना खुले करण्याचा विचार महाराजांच्या मनी आला. याप्रमाणे आपल्या देशातील कोणत्याही धर्माचा आणि जातीचा मनुष्य पुरोहित होऊ शकतो आणि त्यामुळे प्रतिष्ठेच्या अहंकाराची कोंडी फुटून धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त होईल आणि म्हणून समाजातील ज्या व्यक्तींना पुरोहिताचे काम करावयाचे असेल त्यास पुरोहिताचे काम चांगले समजले पाहिजे. यासाठीच पुरोहित शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. ब्राह्मणेत्तर वर्गातील पुरोहित तयार करून देव आणि मानव यांच्यातील बदली करायची नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार :

१. शिक्षण : समाजोन्नतीचे प्रभावी साधन :

महाराज शिक्षणास मानवी गुंतवणूक मानत होते. या दृष्टीने शिक्षण म्हणजे अक्रोडाचे झाड ठरते. ते पुढील पिढ्यांसाठी फळा-फुलांनी बहरून येते. त्यासाठी मागील पिढीतील लोकांना ते लावावयाचे असते. त्यास खतपाणी घालू वाढावयाचे असते. आपणास शेकडो वर्षांची तयारी करावयाची असेल तर माणसे पेरावी लागतात. म्हणूनच शिक्षण प्रसाराच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की, 'ज्योतीरावे रचिला पाया, शाहू झालासे कळस' या कळसावर पुढे कर्मवीर भाऊराव पाटलांनी पताका फडकवली, महाराजांना लोकांना शिकवायचे नव्हते, तर कारण राधाकृष्णन म्हणतात, त्याप्रमाणे 'साक्षर : इति राक्षस:' असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून शिक्षणामुळे लिहिता-वाचता येणे, लिहिलेले समजणे, समजलेले आचरणात आणणे आणि जे आचरणात आणावयाचे ते का ठोस विचार ठरविणे इतक्या प्रक्रिया शिक्षणात येतात. यासाठी प्रत्येक मनुष्याच्या अवती-भवती पसरलेली दुनिया आहे तिच्या सर्वंकष, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि नैतिक झगड्यातील शिक्षण हे प्रभावी साधन आहे, योच सर्वांना आकलन व्हावे म्हणून महाराज आपल्या हाती ज्ञान-ज्योत घेऊन आईच्या प्रेमाने जागे करत होते.

२. विद्येच्या मक्तेदारीला मूठमाती :

शिक्षण ही कोणचीही मक्तेदारी नाही आहे. केवळ समाजातील विशिष्ट वर्गाने त्याचा लाभा घ्यावा असेही नाही आहे. शिक्षण हा सर्वांचा प्रमुख अधिकार आहे, आणि तो सर्वांना मिळालाच

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ISSN No. 2394-5990

पाहिजे ही महाराजांची भूमिका होती. म्हणूनच त्यांनी पुरोहिताकडील शिक्षणाची मक्तेदारी मोडीत काढून समाजातल्या सर्व लोकांना शिक्षण मिळावे यासाठी यशस्वी प्रयत्न केले. शिक्षणाशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही असे महाराज म्हणत असत. म्हणूनच त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचा लाभ मिळावा, त्यांचा विकास व्हावा, समाज सुधारावा याकरिता प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले, त्याचबरोबर उच्च शिक्षणाचा ही लाभ सर्वांना मिळावा याकरिता प्रयत्नशील राहिले.

३. शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबन :

शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबन साधले पाहिजे, असे शाहू महाराजांचे मत होते. म्हणून सामान्य माणसाच्या उन्नतीच्या आड येणारे सर्व अडथळे महाराजांनी दूर केले. सामान्य माणसांच्या उन्नतीमध्ये समाजाची उन्नती सामावलेली आहे असे महाराज म्हणतात. यासाठीच महाराज सर्वांना उन्नतीचा मूलमंत्र देत होते.

४. जातीभेदाच्या निर्मूलनासाठी शिक्षण :

अनेक जाती, धर्म, वंश आणि भाषा यांनी नटलेला भारत देश म्हणजे अनेक रंगाच्या फुलांच्या माळेसारखा सुंदर दिसतो. या सर्व भिन्नत्वामध्ये भारतीयत्वाचे एकत्व दिसते. परंतु कधी जातीच्या, धर्माच्या तर कधी भाषेच्या नावावर श्रेष्ठ-कनिष्ठता समाजात पसरते तेव्हा समाजाच्या सर्व घटकांवर दुष्परिणाम होतो. १९व्या शतकात व्यक्तिस्वातंत्र्यवादी भूमिकेचा प्रचार चालू असून देखील परंपरेचे, रुढींचे डोंगर तसूभर देखील हलले नाहीत. त्यामुळे जातीव्यवस्थेचा पगडा तसाच राहिला इंग्रजाच्या आगमनाने शिक्षण प्रसार सुरू झाला. त्यामुळे जातीच्या बुरुजांवर प्रहार सुरू झाले. फुले, आंबेडकर यांनी हे कार्य मनापासून केले. परंतु ज्यांच्या अंतरंगात मनस्पर्शी असे सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहत होते, त्या समाज सुधारकांतील एक राजबिंडा पुरुष शाहू महाराजांचे प्रथम नाव घ्यावे लागेल. फुले, आंबेडकरांनी जातीभेद निर्मुलनासाठी शिक्षणाचे जे महत्त्व सांगितले, त्याच शिक्षणाचा उपयोग शाहू महाराजांनी जातीभेद निर्मुलनासाठी केलेला दिसून येतो.

शेवटी केवळ मला असे म्हणावे वाटते, की पृथ्वीच्या पाठीवर अनेक राजे, सम्राट झाले असतील पण समाजातील मानवेतर माणूस म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फार थोडे झाले असतील. राजश्री शाहू महाराज त्यांपैकी एक होत. सामाजिक क्रांतीचे त्यांचे स्वप्न एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आजच्या वादळी जीवनात आपल्याला वाट दाखवायला पूर्णपणे समर्थ आहे.

संदर्भ सूची :

- भगत रा. तु., 'राजर्षी शाहू छत्रपती,' ठिया प्रकाशन, कोल्हापूर, २०११,पृ.२१८
- कुंभार नागोराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान,' प्रबोधन प्रकाशन, लातूर, २०२२, पृ. क्र. ३५.
- कित्ता, पृ.क्र. ३५.
- भगत रा. तु. उ.नि, पृ. २२०.
- भगत रा. तु. उ.नि, पृ. २२२.
- भगत रा.तु. उ.नि, पृ. २२६.
- भगत रा.तु. पृ. २२७.
- भिडे जी. एल., एन.डी.पाटील, ङ्गमहाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहासफ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००९, पृ. १०८.
- भगत रा. तु. उ नि, पृ. २२८.
- भगत रा. तु. उ. नि, पृ. २२९.

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

Paper-I

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

।। संशोधक।।

पुरवणी अंक ३ – मार्च २०२३ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : ३

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- प्राचार्य डॉ.सुनिल हेळकर
- प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड
- प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

*** प्रकाशक ***

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

TOR
Govt. Instt.
of Arts and Social Sciences
NAGPUR

२४. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
- प्रा.डॉ. जवाहर मोरे ---------- ९७

२५. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता
- डॉ. अंकुश तुकाराम करपे ---------- १००

२६. शैक्षणिक व सामाजिक सुधारणांचे प्रणेते : छत्रपती राजर्षी शाहू महाराज
- प्रा. संपतराव माणिकराव गर्जे ---------- १०५

२७. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा समाजसुधारणेच्या संदर्भातील तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोण
- डॉ. उध्दव न. कांबळे ---------- ११०

२८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि समाजसुधारणा
- डॉ. उध्दव न. कांबळे ---------- ११४

२९. राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान
- डॉ. राजेंद्र नामदेव रासकर ---------- ११८

३०. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास
- डॉ. रेश्मा अणवेकर ---------- १२१

३१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक विचार आणि कार्य
- डॉ. गणेश एन. बहादे ---------- १२६

३२. सर्वंकष सुधारणांचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज
- किशोर जनार्दन लांडेपाटील ---------- १३०

३३. छत्रपती शाहू महाराज : सामाजिक क्रांतीचे आधारस्तंभ
- डॉ. विकास विलासराव शिंदे ---------- १३५

३४. राजर्षी शाहू महाराज यांची समतावादी दृष्टी व समकालीन प्रस्तुत
- प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ ---------- १३९

३५. मानवतावादी व्यक्तिमत्व – राजश्री शाहू महाराज
- प्रा. डॉ. आनंदा एम. काळबांडे ---------- १४४

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा समाजसुधारणेच्या संदर्भातील तत्त्वज्ञानात्मक दृष्टीकोण

डॉ. उध्दव न. कांबळे
सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
ई-मेल : unkamble27@gmail.com
मोबाईल - ८३५६०८६३८८

सारांश :

चार्वाक, बुध्द, फुले, मध्ययुगातील संत महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम आदि सर्व सुधारकांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर सबंध देशातील समाज सुधारणेच्या संदर्भात विचारांच्या माध्यमातून विद्रोह केलेला होता. त्यांच्या कार्यामूळे समाजातला वंचित समूह पुरोहित शाहीच्या कचाट्यातून पूर्णपणे सुटला, मुक्त झाला असे मी म्हणणार नाही, पण त्यांचे जीवन काही प्रमाणात सुसह्य झाले. एकोणविसाव्या शतकात शाहू महाराजांच्या प्रयत्नांनी समाज सुधारणेला वेग आला. शाहू महाराजांनी समाज सुधारणेकरीता समाजातील सर्व अनिष्ट गोष्टीला विरोध करून, प्राथमिक, व्यावसायिक, उच्च आणि मोफत शिक्षणाची अंमलबजावणी केली. यामुळे समाजसुधारणेत आमुलाग्र बदल घडून आले.

सूचक शब्द : शाहू महाराज, समाजसुधारणा, मोफत शिक्षण, स्वराज्य, अस्पृश्य.

प्रस्तावना :

विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढणारी, सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, बहुजन समाजाच्या उध्दारासाठी तळमळणारी व मार्गदर्शन करणारी लोकोत्तर व्यक्ती राजर्षी शाहू महाराज होत. ते एका संस्थानाचे अधिपती असले तरी त्यांचे मन लोकशाहीवाद्यांचे होते, वागणूक समतेच्या पुरस्कर्त्यांची होती. बहुजन समाजाची व विशेषत: अस्पृश्य वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांच्या सर्वांगीण उद्धारचे कार्य त्यांनी सुरू केले व त्याद्वारा महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याचा मौलिक प्रयत्न केला.

शाहूमहाराजांच्या काळात, स्पृश्य माणसांचे पिंड व विचार सनातनी होते. सामाजिक समतेचे कार्य म्हणजे कार्यकर्त्याला ती सुळावरची पोळीच. त्या काळात, राजकीय सुधारणा अगोदर की सामाजिक सुधारणा अगोदर असे वातावरण होते. राजकीय सुधारणावादी मतवाद्यांचा मोठा जोर होता. अशा काळात सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे तत्त्वज्ञान समाजापुढे धाडसाने मांडून, दलितोद्धारासाठी मूलगामी व क्रांतीकारक अशी ठाम व निश्चित भूमिका शाहूमहाराजांनी घेतली. यामध्येच त्यांचे मोठेपण आहे. दलित माणसाला, अस्पृश्य माणसाला माणूस मानून माणसाप्रमाणे वागविण्याचे शाहू महाराज यांचे कार्य चिरंतन व ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

जातिव्यवस्था विषयक विचार :

भारतातील उच्चनीच स्वरूपाच्या जातिव्यवस्थेतून जन्माला आलेला एक महाभयंकर प्रकार म्हणजे अस्पृश्यता आहे. त्याकरिता ही उच्चनीच जातीजातींची उतरंड मोडली पाहिजे व जातीभेदाचा हा विषवृक्ष मुळासकट उपटून काढला पाहिजे, अशी शाहू महाराजांची सुरुवातीपासून भूमिका होती. अस्पृश्यता हे याच जातिव्यवस्थेच्या समाजवृक्षाला आलेले महाभयंकर विषारी फळ आहे. त्या वृक्षाचे निर्मुलन करावयाचे असेल तर त्याकरीता आपल्या समाजातले जातीभेद गाडले पाहिजेत, मोडले पाहिजेत, त्याशिवाय समाजात खरी समता निर्माण होणार नाही. जातीभेद समाजघातकी आहे. त्याचप्रमाणे तो राष्ट्रालाही विघातक आहे.

शाहू महाराज आपल्या एका भाषणात असे म्हणाले होते की, 'भारताशिवाय इतर कोणत्याही देशात मनुष्यात जात नाही परंतु दुर्दैवाने हिंदुस्थानात मात्र जातिभेद इतका तीव्र आहे की मांजर, कुत्रे यापेक्षादेखील कमी अशाप्रमाणे आम्ही आपल्या देशबांधवास व भगिनीस वागवितो. तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातीभेद मोडून आम्हांस मनुष्याप्रमाणे वागवतील असे पुढारी पाहिजेत.'

सर्व जातींच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूरवर ठेवा, पायापुरते पाहू नका. जातीभेद मोडणे इष्ट आहे, जरूरीचे आहे. जातीभेद पाळणे हे पाप आहे. देशाच्या उन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे

DIRECTOR
Vasantrao Naik Govt. Instt
of Arts and Social Sciences
NAGPUR

ISSN No. 2394-5990

जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. तद्वत स्वराज्यावर सर्वांचा हक्क राहील. त्याकरीता महाराज दहा वर्षापर्यंत आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे असे म्हणतात.

महार वतनाचे उच्छाटण विषयक विचार :

महाराष्ट्रात महार वतनाची परंपरा आज शेकडो वर्षापासून चालत आलेली आहे. ही वतनाची जुलमी श्रृंखला महार समाजाच्या पायात अडकविल्यामुळे त्यांच्या सामाजिक प्रगतीचा मार्ग खुंटला होता. या वतनदारीमुळे त्यांना गावकीची सर्व कामे विनामोबदला करावी लागत. वीतभर इनामी जमिनीच्या तुकड्यांसाठी गावातील सर्व महार जमात अहोरात्र राबत असे. सरकारी वेठबिगारीची कामे सोडून गावकऱ्यांच्या कामासाठी महारांना अहोरात्र राबविण्याची वहिवाट होती. या परिस्थितीमुळे महार समाजाचे जीवन अत्यंत कष्टमय बनले होते. रात्री अपरात्री येणाऱ्या वेठबिगारी उचलण्यात महार समाजाचा जीव मेटाकुटीला आला होता. अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडल्यामुळे आणि वेठबिगारीच्या राक्षसी जीवनाखाली सगळी जमात भरडली गेली होती. सामाजिक व धार्मिक रुढींमुळे आणि जातीभेदाच्या दडपणाखाली सर्व बाजूंनी पिडलेल्या समाजाला कसे मुक्त करता येईल, ही एक गंभीर समस्या महाराजांना सारखी जाचत होती. याकरीता महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सल्ला घेतला, या समाजाला गुलामगिरीच्या दास्यविमोचनातून जर कायमचे मुक्त करायचे असेल तर, त्यांचे महारकी वतन नष्ट करा. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराजांना सांगितले. बलुत्यासाठी रात्रंदिवस काबाडकष्ट करून लाचारी पत्करणारे जीवन महार समाजाच्या माणुसकीला काळीमा फासणारे आहे, तसेच महारकी व तराळकी यांमुळे स्वाभिमान नष्ट झाला आहे. अशा परिस्थितीत त्यांना जर सुधारावयाचे असेल, तर वतनाचे उच्चाटन करणे हा एकच प्रभावी मार्ग आहे, याची खात्री महाराजांना पटली. म्हणूनच सर्वांगीण परिस्थितीचा विचार करून महाराजांनी महारकी वतन नष्ट केल्याचे फर्मान काढले आणि अशा रीतीने लोकांच्या सार्वजनिक व धार्मिक धोरणाला जोरदार धक्का दिला.

पुनर्विवाह विषयक विचार :

